रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १४६
www.ramprahar.com
बुधवार, १३ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

विकसित भारत संकल्प यात्रेला पनवेलमध्ये प्रतिसाद/३
मोरबे धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर पुढील आठवड्यात चर्चा/५
क्रिकेटपटू ऋषभ पंत आगामी आयपीएलमध्ये खेळणार?/८

## राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी सुनील शुक्रे



**मुंबई :** आधी दोन सदस्यांनी आणि त्यानंतर अध्यक्षांनीही राज्य मागासवर्ग आयोगाच्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्य सरकारने या आयोगाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी न्या. सुनील शिक्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच सदस्यपदाच्या रिक्त जागांवर ओमप्रकाश जाधव, मारूती शिंगारे, मच्छिंद्रनाथ तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षणाच्या मागणीचा जोर वाढल्यानंतर सरकार दरबारी हालचालींना वेग आला. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी या समाजाचे मागासलेपण सिद्ध होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने सर्वेक्षण करण्याची विनंती राज्य सरकारकडून राज्य मागासवर्ग आयोगाकडे करण्यात आली होती.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## पत्रकार दिनानिमित्त पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड पुरस्कार सोहळ्याचे आयोजन ७ जानेवारी रोजी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. या वेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत अविरतपणे उल्लेखनीय कार्य करणारे आणि सर्व



समाजाला प्रेरणादायी असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

पत्रकार दिनानिमित्त पत्रकार मेळावा व आंतरराष्ट्रीय एक्सलन्स पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पत्रकारिता तसेच इतर क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान महिला व पुरुषांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास संपूर्ण देशातील तसेच परदेशातील पुरस्कारार्थी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार प्रसाद लाड, उद्योजक जे.एम. म्हात्रे, संपादक विवेक मेहेत्रे आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले असून या सोहळ्यास नागिरकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केले आहे.

# युवा संघर्ष यात्रेत राडा

## आमदार रोहित पवार पोलिसांच्या ताब्यात

**नागपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेवर धडकणारी युवा संघर्ष यात्रा मंगळवारी (दि.१२) पोलिसांनी अडवली. या वेळी कार्यकर्त्यांनी बॅरिकेटस् तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्यांची धरपकड केली. आमदार पवार यांनाही ताब्यात घेण्यात आले.

तुम्ही शांततापूर्वक येथून परत जा, असे आम्ही आमदार रोहित पवार यांना सांगितले होते, मात्र परवानगी नसतानाही ते विधिमंडळाकडे निघाले होते. त्यामुळे आम्हाला त्यांना ताब्यात घ्यावे लागले, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

आमदार रोहित पवार यांच्या युवा संघर्ष यात्रेच्या सांगता समारंभानंतर राडा पहायला मिळाला. पवार यांनी काही मागण्या केल्या आहेत. यात्रेच्या सांगता समारंभानंतर



कार्यकर्त्यांनी विधानभवानकडे कूच केली. त्यांनी बॅरिकेट्स तोडून प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी काही प्रमाणात लाठीचार्ज करून त्यांची धरपकड केली.


या सर्व राडेबाजीनंतर पोलिसांनी आमदार रोहित पवार यांना ताब्यात घेतले. पवारांना ताब्यात घेतल्यानंतर राष्ट्रवादी आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या गाडीजवळ ठिय्या मांडला. यामुळे परिसरात एकच गोंधळाचे वातावरण पहायला मिळाले.

पोलिसांनी रोहित पवार यांच्याशी चर्चा करून समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र पवार आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. त्यानंतर मग पोलिसांनी कार्यकर्त्यांसह पवारांना ताब्यात घेतले. अधिवेशन काळात जे नियमभंग करतात त्यांना डिटेन्शन सेंटरमध्ये नेले जाते. पवार यांनाही याच डिटेन्शन सेंटरमध्ये नेण्यात आले. त्यामुळे ते विधानभवनात जाऊ शकले नाहीत.

याबाबत पोलीस म्हणाले की, आम्ही आमदार रोहित पवार यांच्याशी चर्चा केली, पण त्यांनी सहकार्यास नकार दिला. युवा संघर्ष मोर्चा यांच्यामार्फत आंदोलन करण्यात येत होते. रोहित पवार यांनी विधानभवनावर धडक देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पवार यांना ताब्यात घेऊन डिटेन्शन सेंटरला नेण्यात आले. या सर्व राड्याचे व्हिडीओ फुटेज आमच्याकडे आहे. ते पाहून आम्ही योग्य ती कारवाई करू.

## दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन

**मुंबई : प्रतिनिधी**



दिशा सालियन मृत्यूप्रकरणी आदित्य ठाकरेंची विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) चौकशी होणार आहे. त्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. यामुळे ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

दिशा सालियन ही दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची तत्कालीन मॅनेजर होती. ८ जून २०२० रोजी मालाडमधील राहत्या घरी १४व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला. एका पार्टीत दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिशा मृत्यूप्रकरणी एसआयटी चौकशी करण्याची घोषणा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या हिवाळी अधिवेशनात केली.

दिशाच्या मृत्यू प्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटी समितीमध्ये अपर पोलीस आयुक्त राजीव जैन, उपायुक्त अजय बन्सल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांचा समावेश आहे. यामध्ये क्राईम ब्रांच आणि इतर युनिट्सच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

## समुद्रकिनारी सापडलेल्या चरसची विक्री

### रेवदंडा बोर्लीतून दोघांना अटक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील बोर्ली येथे चरस या अमली पदार्थाच्या विक्रीप्रकरणी नवी मुंबईतील पथकाने दोघांना अटक केल्याची चर्चा सर्वत्र पसरल्याने एकच खळबळ उडाली आहे. यामुळे समुद्रकिनारी सापडलेल्या व लपवून ठेवलेल्या चरसची विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

नवी मुंबई अमली पदार्थविरोधी विभागाच्या पथकाने सोमवारी मुरूड तालुक्यातील बोर्ली येथील दोघांना चरसच्या विक्रीप्रकरणी अटक केल्याचे समजते. शिवाय दोन मित्रांची चरसच्या व्यवहारातून भांडणे व हाणामारी झाल्याचीही चर्चा आहे. काशिद या पर्यटनस्थळी आलेल्या पर्यटकांना ही चरसची पाकिटे विक्री करण्यात आली. चरस खरेदी करणाऱ्या नवी मुंबईतील काही जणांनी याची विक्री अल्प किमतीत केली जात असल्याचा बोभाटा केल्याने हे खरेदी-विक्री प्रकरण बाहेर पडले. यामध्ये रेवदंडा येथील दोन युवकांचाही समावेश असल्याची चर्चा असून त्यांनी येथून पोबारा केल्याचे कळते. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही अथवा कसलीही माहिती उपलब्ध नसल्याचे कळते.



(संग्रहित छायाचित्र)

काही महिन्यांपूर्वी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात समुद्रकिनारी चरसची पाकिटे आढळली होती. या पाकिटांवर गरूड व नागाचे चित्र होते तसेच अफगाण प्रॉडक्ट असे इंग्रजीमध्ये लिहिलेले होते. ही पाकिटे पोलिसांनी ताब्यात घेतली होती. किनारी वाहून आलेली चरसची पाकिटे अनेकांच्या हाती लागली. यातील काहींनी ती लपवून ठेवली व कालांतराने ग्राहकांचा शोध घेऊन त्याची विक्री केली जात होती.

अखेर नवी मुंबई अमली पदार्थविरोधी पथकाने काशिद येथे चरसच्या खरेदी व विक्री प्रकरणाचा सुगावा घेऊन बोर्ली येथील दोघांना अटक केल्याचे वृत्त आहे. या प्रकरणी रायगड पोलीस कोणती भूमिका घेतात व कशा पद्धतीने कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे, मात्र याबाबत अधिकृत वृत्त प्राप्त होत नसल्याने चर्चेचे गुऱ्हाळ सर्वदूर पसरत आहे.

## निवडक

### राजस्थानच्या मुख्यमंत्रिपदी भजनलाल शर्मा यांची निवड

**जयपूर :** छत्तीसगड, मध्य प्रदेशप्रमाणेच भाजपने राजस्थानमध्येही नेतृत्व बदल केला असून भजनलाल शर्मा यांना नवे मुख्यमंत्री म्हणून निवडले आहे, तर दिया कुमारी आणि प्रेमचंद बैरवा हे दोन उपमुख्यमंत्री असतील. ५६ वर्षीय शर्मा हे पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले असले तरी त्यांनी पक्ष संघटनेत दीर्घकाळ काम केले असून ते चार टर्म प्रदेश सरचिटणीस होते. त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी आहे तसेच त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतही काम केलेले आहे.

### सीबीएससी दहावी, बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएससी) दहावी आणि परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १५ फेब्रुवारी २०२४पासून या परीक्षांना सुरुवात होणार आहे. याचे वेळापत्रक वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## राज्यात १७ ठिकाणी स्वयंचलित वाहन परवाना तपासणी मार्ग उभारले जाणार

**नागपूर : प्रतिनिधी**

रस्ते अपघात रोखण्यासाठी असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचे दृश्यस्वरूपात बदल दिसून येतील, अशी ग्वाही देतानाच राज्यात १७ ठिकाणी स्वयंचलित वाहन परवाना तपासणी मार्ग, २३ ठिकाणी स्वयंचलित वाहनयोग्यता प्रमाणपत्र केंद्र उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि.१२) विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.



राज्यात होत असलेल्या वाहन अपघाताबाबत प्रश्न उपस्थित झाला असता त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, समृद्धी महामार्गावर वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आतापर्यंत किमान ६० ते ७० लाख वाहनांनी प्रवास केला असून समृद्धी महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक दहा किमी अंतरावर रम्बलर बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचादेखील वापर करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

वाहनचालक परवाना स्वयंचलित पद्धतीने देण्यासाठी राज्यात १७ ठिकाणी ऑटोमॅटीक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक उपलब्ध करून देण्यात येत असून त्या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. ट्रॅकसाठी दोन महिन्यात कार्यादेश देण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. २३ ठिकाणी ऑटोमॅटीक फिटनेस सेंटर्सदेखील करण्यात येत असून वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्राची मदत संपण्यापूर्वी संबंधितांना पूर्वकल्पना देण्याबाबत यंत्रणा तयार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## आंबा पिकाच्या संरक्षणासाठी टास्क फोर्स

### कोकण कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस, वादळी वारे, गारपीट, रोगांचा प्रादुर्भाव या पार्श्वभूमीवर कोकणातील आंबा पिकासाठी टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. आंबा पिकावर येणारी संकटे वेळेत रोखण्यासाठी संशोधन करण्याची मुख्य जबाबदारी या टास्क फोर्सची असणार आहे. या आठ सदस्यीय टास्क फोर्समध्ये दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचा समावेश आहे.

अशा प्रकारची समिती असावी अशी मागणी कोकणातील शेतकऱ्यांकडून सातत्याने केली जात होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात अधिकाऱ्यांची तत्काळ बैठक घेत टास्क फोर्स स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या या टास्क फोर्समुळे संपूर्ण कोकणातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. ज्याप्रमाणे द्राक्ष, ऊस पिकाच्या संरक्षणासाठी कृती दल आहे त्याप्रमाणे कोकणातील आंबा पिकासाठी अद्याप तरी असे कृती दल नव्हते.

कोकणात सातत्याने आंबा पिकावर संकट येत चालली आहेत. त्यामुळे आंबा पीक घ्यावे की घेऊ नये, या विवंचनेत रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक आहेत. अवकाळी पावसाने जिल्ह्यातील आंबा उत्पादकांची या वर्षीही चिंता वाढवली आहे. **(पान २ वर..)**



*कृती दल खासकरून आंबा पिकाच्या संरक्षणासाठी काम करणार आहे. त्यामुळे त्याचा कोकणातील शेतकऱ्यांना निश्चितच चांगला फायदा होईल. वेगवेगळ्या रोगांना वेळेतच रोखण्यात यश आल्यास शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी करून चांगल्या दर्जाचे पीक घेता येईल. यातून निर्यातक्षम आंबा पिकाचे उत्पादन येथील बागायतदारांना घेता येईल.*
***-संदेश पाटील,** बागायतदार*

*स्थापन केलेले टास्क फोर्स संपूर्ण कोकणासाठी कार्यरत असणार आहे. वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांवर सखोल संशोधन करून ते शेतकऱ्यांसाठी उपलब्ध केले जाणार आहे. यापूर्वी अशी व्यवस्था नव्हती, परंतु मागील काही वर्षांपासून आंबा पिकावर येणाऱ्या संकटांचा विचार करून अशी व्यवस्था असावी अशी मागणी केली जात होती. भविष्यातील संकटांचा सामना करण्यासाठी हे टास्क फोर्स येथील शेतकऱ्यांना उपयोगी पडेल.*
***-उज्ज्वला बाणखेले,** अधीक्षक, कृषी विभाग*

# तयार भाजी रोपांना शेतकऱ्यांची पसंती

## 'अवकाळी'मुळे लागवडीला झालेला उशीर भरून निघणार

**माणगाव : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस शेतीचे गणित बिघडवत असताना शेतकरी तयार रोपांना पसंती देत असून भाजी लागवडीला होणारा उशीर भरून काढत आहेत. त्यामुळे रोपवाटिकेत तयार झालेल्या रोपांना चांगली मागणी आहे.

पावसाळा संपल्यानंतर नोव्हेंबर ते मे या सात महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात भाजीपाला उत्पादन घेतले जाते. या वर्षी नोव्हेंबर महिन्यापर्यंत लांबलेल्या पावसामुळे भाजीपाला पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना नांगरणी व इतर कामे करण्यास वेळ झाला. यामुळे पिकांचा हंगाम पुढे सरकणार ही बाब लक्षात घेऊन माणगाव तालुक्यातील शेतकरी बियाणे लागवड करण्याऐवजी थेट तयार



रोपे लागवड करीत आहेत.

थंडीचा हंगाम व भाजीपाला पिकाची लागवड लवकर व्हावी या उद्देशाने अनेक शेतकऱ्यांनी जमिनीत बियाणांची लागवड न करता तयार रोपांना पसंती दिली आहे. यंदा रोपवाटिकेमधून वांगी, मिरची, टोमॅटो व इतर भाज्यांची तयार रोपे विकत घेऊन शेतामध्ये लागवड केली जात आहेत. काही शेतकरी पुणे व इतर शहरातून कलिंगड व अन्य फळांची रोपे आणून लागवड करीत आहेत. ही रोपे २० ते ४० दिवसांची आहेत. रोपे प्रति दोन रुपये व पुढे अशी मिळत असून शेतकरी मोठ्या प्रमाणात रोपे खरेदी करत आहेत.


रोपवाटिकेतील रोपे सरी वाफे तयार करून लागवड केल्यावर पिकाच्या उत्पादनास लवकर सुरुवात होईल व पावसामुळे बियाणे लागवड करण्यास झालेला उशीर तयार रोपांमुळे भरून निघेल, असे शेतकरी सांगत आहेत. गेल्या काही वर्षांपासून तालुक्यातील केवळ प्रगत शेतकरी तयार रोपांना पसंती देत असताना यंदा लांबलेल्या पावसामुळे इतर अनेक शेतकरीही तयार रोपांची लागवड करीत आहेत.

यानिमित्ताने रोपवाटिकांनाही व्यवसायाचे एक नवे साधन उपलब्ध झाले असून दोन ते चार रुपयांना विविध बियाण्यांची तयार रोपे विक्रीस उपलब्ध आहेत. तालुक्यात साधारणपणे दीड ते दोन लाख तयार रोपे विकली गेली असून पुढील काळात अजून विक्री वाढणार आहे.

***अवकाळी पावसामुळे भाजी पिकाचा कालावधी पुढे सरकतो. ओल्या जमिनीत लगेच लागवड करता येत नाही. तयार रोपांमुळे सुरुवातीचा लागवड कालावधी कमी करता येतो. २० ते २५ दिवसांची रोपे लागवड केल्याने मागील कालावधी भरून निघतो व उत्पादनही लवकर सुरु होते.***
***-रामदास जाधव, शेतकरी, बोरघर***

***दरवर्षी आम्ही काही हजार तयार भाजी रोपे विकतो. या वर्षी अधिक वाढ झाली आहे. दोन रुपयांना रोप असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणात तयार रोपे विकत घेतात. मिरची, वांगी, टोमॅटो इत्यादी रोपांना अधिक मागणी आहे. ३० ते ३५ दिवसांची ही रोपे आहेत.***
***-राजेश कोलवणकर, रोप विक्रेता, इंदापूर***

## भारत हॉकी वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये



**क्वालालंपूर : भारताच्या युवा हॉकी संघाने ज्युनियर वर्ल्डकप स्पर्धेत तगड्या नेदरलँड्सला ४-३ अशी मात देत उपांत्य फेरीत धडक दिली. (वृत्त पान ८ वर..)**

# राजकीय आरक्षणामुळे महिलांना अनेक संधी

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन



**नागपूर : प्रतिनिधी**

समाजकारण व राजकारणामध्ये महिला आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. राजकीय आरक्षणामुळे महिलांना समाजकारण व राजकारण या क्षेत्रात अधिकची संधी निर्माण होणार आहे. या आरक्षणामुळे समाजात सकारात्मक बदल दिसू लागतील असा विश्वास विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

विधान भवनात आयोजित राष्ट्रकुल संसदीय अभ्यास वर्गात संसदीय लोकशाही व महिला धोरण या विषयावर अभ्यास वर्गासाठी सहभागी झालेल्या विविध विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. या वेळी विधानमंडळ सचिव विलास आठवले, दैनिक सकाळच्या नागपूर आवृत्तीचे संपादक संदीप भारंबे, विधिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, महिला आज सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांनी आयएएस, आयपीएस, न्यायाधीश यासह क्रीडा क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. आजच्या समाज माध्यमांच्या क्षेत्रातही त्या उत्कृष्टपणे काम करीत आहेत. या विविध क्षेत्रातील सहभागामुळे समाजात महिलांबद्दल अधिक आदर निर्माण होत आहे. महाराष्ट्र राज्य हे महिलांना संधी देण्यात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. यामुळे राज्यातील महिलांनी शिक्षण,राजकारण, क्रीडा प्रशासन अशा सर्वच क्षेत्रात आपली वेगळी छाप उमटवली आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी, महिला प्रश्नांचा अजेंडा अधिक समोर आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही डॉ. गोऱ्हे यांनी केले.

डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, १९९० साली तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्यासोबत महिला आघाडीची बैठक झाली. त्यामध्ये महिला आरक्षणाचा मुद्दा मांडण्यात आला. त्यानंतर राष्ट्रीय महिला आयोग तयार करण्यात आला. घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना आरक्षण लागू झाले, मात्र हे आरक्षण लोकसभा राज्यसभा निवडणुकीत लागू नव्हते. संसदेच्या २०२३ च्या पावसाळी अधिवेशनाची महिला सक्षक्तीकरणाच्या दृष्टीने ऐतिहासिक पर्व म्हणून नोंद झाली आहे. नारी शक्ती वंदन अभियान या नावाने सादर केलेल्या १२८व्या घटना दुरूस्ती विधेयकावर संमतीची मोहोर उमटल्याने यापुढे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये किमान ३३ टक्के महिला आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात घेतलेला पुढाकार निश्चितच आश्वासक ठरला असल्याचेही डॉ. गोऱ्हे म्हणाल्या.

या संसदीय अभ्यास वर्गातील अनमोल मार्गदर्शनामुळे सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व निश्चितच विस्तारेल तसेच महिला सबलीकरण आणि महिलांच्या राजकीय सहभागाबाबत त्यांचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक आणि आश्वासक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी पत्रकार संदीप भारंबे यांनी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा परिचय करून दिला, तर कार्यक्रमाच्या शेवटी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा विद्यार्थी शंतनू अहिर याने उपस्थितांचे आभार मानले.

# भाजपतर्फे अल्प दरात कांद्याची विक्री




**अलिबाग : प्रतिनिधी**

निर्यात बंदीवरून राज्यात वातावरण तापले असतानाच रायगड जिल्ह्यातील भाजप नेते दिलीप भोईर यांनी ग्राहकांना दहा रुपये दराने कांदा वाटपाची योजना राबविली आहे. अलिबाग तालुक्यात प्रतीग्राहक पाच किलो या प्रमाणे त्यांनी सात टन कांद्याचे वितरण केले आहे.

अवकाळी पाऊस आणि त्यामुळे झालेले कांदा पिकाचे नुकसान हे लक्षात घेऊन केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातली आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील भाजप नेत्याने ग्राहकांना स्वस्तात कांदे विकण्याचा उपक्रम राबविला आहे. दहा रुपये किलो दराने त्यांनी अलिबाग तालुक्यातील विविध गावांत कांद्याची विक्री केली आहे. ग्राहकांचाही या उपक्रमाला उदंड प्रतिसाद लाभला आहे.

दिलीप भोईर असे या भाजप नेत्याचे नावे असून, ते रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष आहेत. मध्यंतरीच्या काळात खुल्याबाजारात कांद्याचे दर ७० रुपयांपर्यंत पोहोचले होते. कांद्याचे हे चढे दर लक्षात घेऊन त्यांनी गावागावत स्वस्त कांदे विकण्याचा उपक्रम हाती घेतला. घाऊक बाजारातून कांद्याची उचल करून त्यांनी अलिबाग तालुक्यात स्वस्तात कांदे विक्री सुरू केली. अलिबाग तालुक्यातील रामराज, रेवस, वावे, झिराड, चौंढी या गावात प्रती ग्राहक पाच किलो या प्रमाणे कांद्याचे वितरण केले जात आहे. यासाठी प्रतिकीलो दहा रुपये असा दर आकारला जातो आहे. आत्ता पर्यंत एकूण सात टन कांद्यांची स्वस्तात विक्री करण्यात आली असून, या उपक्रमाला ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद दिला आहे. स्वस्तात कांदे खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडत असल्याचे या निमित्ताने पहायला मिळते आहे.

# डोलवी ग्रा.पं.मधील भ्रष्टाचारप्रकरणी गुन्हा

## दोषींवर कारवाईची मागणी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या डोलवी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकासह आजी–माजी सरपंचावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, अशा भ्रष्टाचाऱ्यांना शासनाने पाठीशी घालू नये. त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजी जि.प. सदस्य संजय जांभळे यांनी ग्रामपंचायतीसमोर घेतलेल्या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केली.

डोलवी ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराचा विषय संजय जांभळे यांनी लावून धरला होता. त्यांनी या संदर्भात उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. न्यायालयाकडून शासकीया अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढण्यात आले होते तसेच तातडीने कारवाई करण्यास सांगितले. त्यानुसार ८ डिसेंबर रोजी रात्री उशिरा गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ यांनी तत्कालीन सरपंच वनिता अनिल म्हात्रे, विद्यमान सरपंच परशुराम तुकाराम म्हात्रे आणि ग्रामसेवक दिनेश मोहोरकर यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. त्यांच्यावर वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

यामध्ये ग्रामसेवक दिनेश मोहोरकर यांना निलंबित करण्यात येणार आहे. त्यांना विभागीय चौकशीला सामोरे जावे लागेल तसेच अपहारातील रक्कम ही सरपंच आणि ग्रामसेवकाला अदा करावी लागेल. इतर कायदेशीर कारवाई पोलीसांमार्फत होणार, अशी माहिती गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर शांतीवन नेरे येथे आयोजित केले आहे हे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे उद्घाटन मंगळवारी (दि. १२) सायंकाळी ५ वाजता शांतीवन नेरे येथे झाले.



या शहराच्या उद्घाटन समारंभासाठी विजय पाटील, तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल, जनार्धन भगत शिक्षण प्रसारक संस्था, सुशील शिंदे, ओ.एस.डी राष्ट्रीय सेवा योजना विभाग मुंबई विद्यापीठ, रक्षाबेन मेहता, अध्यक्ष कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे पनवेल, ॲड. प्रमोद ठाकूर, चेअरमन कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे पनवेल व प्रा. टी.पी. मोकल जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रायगड, या सर्वांनी उद्घाटन समारंभासाठी उपस्थित राहून राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना तसेच कार्यक्रम अधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या समारंभासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस के पाटील यांनी उपस्थित राहुन राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व राष्ट्रीय स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले व या सात दिवशी विशेष संस्कार शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील यांनी केले तसेच प्रस्तावना प्रा. सूर्यकांत परकाळे समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना चांगू काना ठाकूर महाविद्यालय पनवेल यांनी केली. प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग, यांनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

# खोपोलीमध्ये भरवस्तीत दारूविक्री

## रहिवासी आक्रमक

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथे भरवस्तीत अरिहंत डी. २ या इमारतीच्या तळमजल्यावर देशी दारूचे दुकान सुरू करण्यात आले. त्यामुळे या इमारतीमधील महिलांनी दुकानासमोरच हल्लाबोल करीत दुकान बंद करण्याची मागणी केली.

सामाजिक कार्यकर्ते सिद्धांत शेलार, मीतेश ठक्कर हे याचवेळी घटनास्थळी दाखल झाले. यावर पालिका प्रशासनाला कळविण्यात आले. उपमुख्याधिकारी गौतम भगळे व नगररचनाचे अधिकारी वर्ग घटनास्थळी दाखल होत या बाबत दुकान मालकास परवानगीबाबत विचारणा केली. तसेच शासनाच्या संबंधित परवानगीचे मूळ प्रति घेऊन नगर परिषद कार्यालयात हजर राहण्याचे त्यास सांगितले. परिसरातील नागरिकांची गर्दी वाढू लागली. अखेर दुकान मालकाने शटरला ताळे ठोकून धूम ठोकली. दुकानाला सोसायटीने कुठलेही दारूचे दुकान सुरू करण्याबाबत परवानगी दिलेली नाही, असे सोसायटीचे सरचिटणीस प्रदीप गायकवाड यांनी सांगितले.



**मुंबई : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त तयार करण्यात आलेल्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार अतुल भातखळकर, आमदार प्रकाश आबिटकर तसेच आशिष देशमुख आदी उपस्थित होते.**

# वेदांत कायंदेकर योगा शिक्षक परीक्षा उत्तीर्ण



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत येथील तासगावकर महाविद्यालयात कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत असलेल्या वेदांत दीपक कायंदेकर (ब्लॅक बेल्ट) हा योगा शिक्षकाची परीक्षा ऐ ग्रेडने उत्तीर्ण झाला. त्याने योगा अभ्यासवर्गाचे प्रशिक्षण अवी योग इन्स्टिट्यूट मुंबईमधून घेतले होते.

वेदांत युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली व बहीण समिक्षा कायंदेकर (सेकंड डन) यांच्या मार्गदर्शनाखाली परदेशी विद्यार्थ्यांना आणि भारतातसुद्धा कराटे आणि स्वरक्षणाचे प्रशिक्षण देत आहे तसेच तो गो अल्फा स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटतर्फे लहान मुलांना खेळाचे प्रशिक्षण देतो.

शासकीय अंगीकृत शैक्षणिक बोर्ड व्यावसायिक प्रशिक्षण आणि अनुसंधान यांचे सर्टिफिकेट आणि अवी योग इन्स्टिट्यूटचे सर्टिफिकेट वेदांतला बहाल करण्यात आले. याबद्दल डॉ.मंदार पनवेलकर, रवींद्र म्हात्रे, निलेश भोसले आणि प्रतिक कारंडे यांनी वेदांतचा सत्कार केला.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात निबंध स्पर्धा

## 'रयत'चे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा वाढदिवस उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात निबंध स्पर्धा घेऊन साजरा करण्यात आला.



इयत्ता आठवी ते दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांना माननीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे बालपण त्यांचे शैक्षणिक कार्य, त्यांचे सामाजिक कार्य, त्यांचे क्रीडा कृषी व राजकीय क्षेत्रातील योगदान तसेच रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून संस्थेतील त्यांचे बहुआयामी नेतृत्व याविषयांवर विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये मराठी हिंदी व इंग्रजीत अशा तीनही भाषांमध्ये विद्यार्थ्यांनी निबंध लिहिले होते.

या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या तज्ञ उपशिक्षिका पी.आर. पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

याचबरोबर इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करण्यासाठी खारघर येथील सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राध्यापक समाधान लांडगे, प्रदीप मुकादम, व प्रकाश गोरवे सर विद्यालयात आले होते दहावीनंतर विद्यार्थ्यांनी कोणत्या क्षेत्रात प्रवेश घ्यावा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती यांची उत्कृष्ट माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

रयत शिक्षण संस्थेच्या रयत गुरुकुल प्रकल्पा अंतर्गत घेण्यात आलेल्या या मार्गदर्शन शिबिराचे प्रास्ताविक रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व गुरुकुल प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले, तर उपस्थित प्राध्यापकांचे आभार विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी मानले.

पान १ वरुन

## आंबा पिकाच्या संरक्षणासाठी टास्क फोर्स

'अवकाळी'ने लांबलेली थंडी, पावसामुळे निर्माण होणारे ढगाळ वातावरण आणि त्यामुळे झालेल्या किडींच्या उपद्रवावर कोणत्या उपाययोजना कराव्यात यासाठी येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज होती. जिल्ह्यात घाटमाथ्याच्या पायथ्याशी असलेला पूर्वपट्टा व समुद्र किनाऱ्यालगतचा पश्चिमपट्टा असे दोन भाग पडतात. या दोन्ही पट्ट्यांतील शेतकरी सद्याच्या स्थितीत चिंचेत आहेत. साधारणपणे फेब्रुबारी, मार्चपर्यंत किनारपट्टीवरील श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड, अलिबाग आणि नजीकच्या भागात आंबा पीक येते, तर जिल्ह्याच्या पूर्वपट्ट्यातील महाड, पोलादपूर, सुधागड–पाली, कर्जत, खालापूर या तालुक्यांतील अनेक गावांमध्ये शेकडो हेक्टर आंबा लागवड आहे. या भागातील आंबा हंगाम पश्चिम भागापेक्षा महिना–दीड महिन्याने उशिराने सुरू होतो. एप्रिल अखेरच्या आठवड्यात या भागातील आंबा हंगाम सुरू होऊन तो मे अखेरपर्यंत चालतो. याच कालावधीत चाकरमानी गावी आल्याने आंब्याची आवकदेखील वाढते. त्यामुळे येथील आंबा उत्पादकांना स्वतंत्र बाजारपेठ शोधावी लागत नाही, पण गेल्या तीन–चार वर्षांपासून कोकणातील आंबा संकटात सापडला आहे. अशा शेतकऱ्यांना टास्क फोर्सचे मार्गदर्शन लाभदायी ठरणार आहे.

# छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये भारतीय भाषा उत्सव

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये सोमवारी (दि. ११) भारतीय भाषा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ साताराचे भाषा मंडळ व छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी, हिंदी, संस्कृत व अर्धमागधी, सांस्कृतिक विभाग व ज्युनियर कॉलेज विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला माझी भाषा माझी स्वाक्षरी या उपक्रमात प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी मातृभाषेत सह्या केल्या. या वेळी रयतवाणी रेडिओ स्टेशनचे प्रमुख



सचिन मेनकुदळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

सचिन मेनकुदळे म्हणाले की, भारतीय भाषा उत्सव देशात एकात्मता निर्माण करण्यासाठी मोठी भूमिका बजावेल. अनेक संस्कृती, भाषांची देवाणघेवाण आपल्याला उपयुक्त ठरत असते. रयतवाणीतर्फे सर्व प्रकारच्या कार्यक्रमाना आम्ही महत्व देत असून विविधता आपण जपत आहोत, असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले की, अनेक भाषा शिकण्याने अधिक ज्ञान मिळत असते. प्रत्येक भाषेत विविध प्रकारचे ज्ञान आहे. आपल्या भारतीय भाषा आपला सांस्कृतिक वारसा असून आपण प्रत्येकाने भारतीय भाषा बोलल्या पाहिजेत.

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक भाषा मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्या प्रा.डॉ.रोशनआरा शेख व डॉ.विद्या नावडकर यांनी केले. या कार्यक्रमास ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. गणेश पाटील, पर्यवेक्षिका प्रा.आसावरी शिंदे, प्रा.डॉ.सविता मेनकुदळे, प्रा.मनोज धावडे ,प्रा. विजया गणमुखी प्रा.ज्युनियर,सिनियर विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**जाहीर सूचना**

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील श्री. आमिर इशाक मलिक आणि सौ. आयेशा आमिर मलिक, राहणार बी-सेक्टर, एच-लाईन, खोली क्र. १५, चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई - ४०००८८ हे गाव वजापूर, तालुका पनवेल आणि जिल्हा रायगड येथे स्थित सर्व्हे क्र. २१/ए/१/ए धारण केलेल्या एकूण मोजमाप ०-९०-२० एच. आर. (जे विक्रेते हे मोज. ०-७०-२० एच. आर. क्षेत्राचे मालक आहेत) पैकी मोजमाप ०-२०-०० एच.आर. समतूल्य २००० चौ. मीटर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे मालक १) श्री. उस्मान फारुक खान, फारुक अली खान यांचा मुलगा आणि २) श्री. इम्रान फारुक खान यांच्याकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध, मध्ये किंवा वर वारसा, करारपत्र, भेट या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या व्यक्तींनी आजपासून १४ दिवसांच्या आत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालयात म्हणजेच चौधरी असोसिएट्स, २८६, ए/२, अझिझ इस्टेट, एस. जी. बारवे मार्ग, कुर्ला पश्चिम, मुंबई ४०० ०७० येथे सूचित करावे.

सही/-
चौधरी असोसिएट्स
ॲडव्होकेट

# घरफोडी, चोऱ्या करणाऱ्या सराईत आरोपींना अटक

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबई आयुक्तालय अंतर्गत कार्यरत असलेल्या न्हावा शेवा पोलिसांकडुन घरफोडी व इतर चोऱ्या करण्याऱ्या सराईत आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिसरातुन रात्रीच्यावेळी मोठया प्रमाणावर रोडवर पार्क असलेल्या अवजड वाहनातील बॅटरी चोरी, घरफोडी, ट्रान्सफार्मर मधील वांयडींग कॉपर वायर, ऑईलसह इतर चोरीच्या घटना घडत होत्या. या आरोपींचा शोध घेवुन कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना वरीष्ठ पोलिसांनी दिल्या होत्या.



त्यानुसार न्हावा शेवा पोलिसांनी तपास वेगाने सुरू करुन या आरोपींना आरोपींना पकडण्यात यश आले आहे.

न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ ते २३ जानेवारी २०२३ दरम्यान जवाहरला नेहरू पोर्ट ऍथोरिटीच्या वित्त विभागाची महत्वाची जुनी कागदपत्रे अज्ञात चोरट्याने दरवाजाचे कडी कोयंडा तोडून घरफोडी करून चोरी करून नेल्याबाबतची फिर्यादी गणेश बाळाराम पाटील यांनी दिली होती. या तक्रारीवरून अज्ञात आरोपी आणि चोरीला गेलेल्या मालाचा शोध घेत असताना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे संशयीत आरोपी मैनुद्दीन इलियास खान आणि छोटु रामतीरथ केवट यांना शिताफिने पकडून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने सखोल तपास केला असता या आरोपींनी या गुन्ह्यांच्या व्यतिरिक्त न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इतर ७ गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

आरोपी यांनी वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये चोरी केलेला मुद्देमाल आणि चोरी करण्यासाठी वापरलेले वाहन असा एकुण तीन लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल न्हावा शेवा पोलीस ठाण्याकडून हस्तगत करण्यात आला व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, या गुन्ह्यातील आरोपींबाबत कोणत्याही स्वरूपाची उपयुक्त माहिती उपलब्ध नसताना न्हावाशेवा पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासात अथक प्रयत्न करून आरोपींची माहिती काढुन त्यांना अटक करून अनेक गुन्हे उघड केले.

## डॉ. डेव्हिड अल्वारीस यांची ट्रिब्यूनल न्यायाधीशपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ. डेव्हिड अल्वारीस यांची महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाचे तांत्रिक न्यायाधीश (ट्रिब्यूनल जज) म्हणून नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



पनवेलमधील डॉ. डेव्हिड अल्वारीस हे रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी म्हणून गेले १२ वर्षांपासून कार्यरत आहेत. तसेच यापूर्वी त्यांनी जीएसटीचे जॉईन्ट कमिश्नर म्हणून काम पाहिले आहे. आता डॉ. अल्वारीस यांची महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण मुंबई खंडपीठाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे.

## विकसित भारत संकल्प यात्रेला पनवेलमध्ये प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेचे पनवेल शहरामध्ये अतिशय उत्साहाच्या वातावरणामध्ये आगमन झाले. या कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या वतीने वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, आयुष्यमान भारत स्वास्थ कार्ड योजना यांची माहिती देणारी दालने उभारण्यात आली होती.

या दालनांच्या माध्यमातून नागरिकांनी केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतली. त्याचबरोबर ज्या नागरिकांनी आपले आयुष्यमान भारत स्वास्थ कार्ड काढले नाहीत अशा नागरिकांना या वेळी तत्काळ त्यांचे आयुष्यमान भारत स्वास्थ कार्ड काढून देण्यात आले. दरम्यान, मंगळवारी (दि.१२) शहरात ही यात्रा आली. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, अधिकारी डॉ. आनंद गोसावी, नेहा म्हात्रे, रोशन माळी, रायगड डिस्टिस्ट्रीक्ट नोडल ऑफिसर प्रसाद कुलकर्णी, पनवेल विकसित भारत संकल्प यात्रा नोडल ऑफिसर अनमोल ठाकूर उपस्थित होते.

## निवडक

### सुकापूर येथील एकाची आत्महत्या

**पनवेल :** सुकापूर येथील बालाजी सिंफोनी या सोसायटीच्या २०व्या मजल्यावरून एका ५६ वर्षीय व्यक्तीने अज्ञात कारणावरून खाली उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. मोहन भोरे असे या इसमाचे नाव आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

### तरुणाची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** एका तरुणाची पाच लाख ५२ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना पनवेल तक्का परिसरात घडली आहे. आरोपीने फिर्यादीस व्हॉट्सअ‍ॅपद्वारे संपर्क साधून पार्ट टाईम जॉबची ऑफर देऊन व व्हॉट्सअ‍ॅपवर गुगल मॅपला स्टार देऊन त्यांचे स्क्रीनशॉट पाठविल्यानंतर १५० रुपये अकांउटवर पाठविले. त्यानंतर आरोपीने टेलिग्रामची लिंक पाठवून त्याद्वारे एका ग्रुपमध्ये जॉईन होऊन तेथे ट्रेडींग केल्यास त्याचा परतावा चांगला भेटेल असे सांगितले. त्यांनी फिर्यादीला टप्याटप्याने या ट्रेडींगमध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन ट्रेडींगमध्ये केलेल्या गुंतवणुकीचे १४,९५,००० रुपये मिळणार आहेत असे खोटे सांगून वेगवेगळ्या खात्यावर एकुण ५,५२,००० रुपये ट्रान्सफर करावयास सांगितले. याबाबत फसवणुकीची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघर आणि तळोजा हद्दीतील नवीन मालमत्ताधारकांच्या हरकतींवर सुनावण्या

**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर व तळोजा हद्दीतील नव्याने बांधकामे पूर्ण झालेल्या मालमत्ताधारकांच्या हरकतींवर महापालिकेच्या मालमत्ता विभागाच्यावतीने सुनावण्या ११ व १२ डिसेंबर रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. या वेळी मालमत्ताधारकांच्या विविध शंकाचे निरसन करण्यात आले.

पनवेल महापालिका हद्दीत नव्याने बांधकामे पूर्ण झालेल्या इमारतींना कर आकारणी करुन प्रारुप याद्या प्रसिद्धी करणेत आल्या होत्या. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचना व मार्गदर्शनानूसार ११ व १२ डिसेंबर रोजी खारघर व तळोजा येथील मालमत्ताधारकांना हरकती घेण्याची संधी देण्यात आली होती. खारघर नोडमध्ये



१४६ हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्याची सुनावणी सोमवारी प्रभाग समिती अ खारघर या कार्यालयात सकाळी ११ ते १ या वेळेत घेण्यात आली. या वेळी सुनावणीसाठी ४३ मालमत्ता धारक उपस्थित राहिले. त्यांनी नोंदविलेल्या हरकती निकाली काढण्याचे काम तत्काळ सुरू करण्यात आले आहे.

याचप्रमाणे तळोजा हद्दीतील सुमारे १५४ हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्यांची सुनावणी मंगळवारी खारघर प्रभाग कार्यालयात घेण्यात आली. या वेळी १३७ मालमत्ताधारक उपस्थित होते. त्यांच्या हरकती निकालात काढण्यात आल्या.

या वेळी मालमत्तेचे एकुण क्षेत्रफळ, मालमत्तावरील नावात बदल अशा विविध शंकाचे निरसन करण्यात आले. मालमत्ता धारकांच्या हरकतीनूसार त्यांच्या मालमत्तांचे पुनर्सर्वेक्षण केले जाणार आहे तसेच नावात बदल असणाऱ्या मालमत्ताधारकांच्या हरकती तातडीने सोडविण्याच्या सूचना उपायुक्त गणेश शेटे यांनी केले आहे.

सुनावणीचे काम उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त व्होरकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी कर अधिक्षक सुनील भोईर, प्रभारी कर अधिक्षक महेश गायकवाड, कर लिपीक अमर पाटील, यजुवेंद्र पाटील, दिपाली म्हात्रे, सेवानिवृत्ती अधिकारी, सुनील मानकामे, हरिश्चंद्र कडु, गणेश साळवी यांनी केले.

## महिलांना फसवणारा गुन्हेगार गजाआड



**पनवेल : वार्ताहर**

आमच्या मालकाना नवसाने मुलगा झाला आहे तरी ते पैसे किंवा साड्या वाटप करीत आहेत अशा प्रकारच्या वेगवगेळ्या बतावण्या करून ज्येष्ठ नागरिक महिलांना करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लबाडीने काढून घेणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अश्या प्रकारच्या तीन घटना घडल्या होत्या. त्यामुळे ज्येष्ठ नागिरक असणाऱ्या महिलांमध्ये भीतीयुक्त वातावरण होते. याबाबतच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांच्या पथकाने आरोपी सुरेश गोविंद काळे (वय ४३, रा. नेवाळी गांव, कल्याण) येथुन ताब्यात घेतले.

त्याने पनवेल परिसरात अश्या प्रकारची तीन गुन्हे त्याचप्रमाणे मुंब्रा पोलीस ठाणे परिसरात १, दादार पोलीस ठाणे परिसरात ०१ व कांजुर मार्ग पोलीस ठाणे परिसरात एक असे एकुण सहा गुन्हे उघडकीस आणण्यात पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील अधिकारी यांना यश आले आहे.

## चिपळे येथे नवीन विद्युत पोल

### भाजप युवा नेते विश्वजीत पाटील यांच्या मागणीला यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे युवा नेते विश्वजीत पाटील यांच्या मागणीनुसार पनवेल तालुक्यातील चिपळे येथील धोकादायक विद्युत पोल काढून नवीन पोल बसविण्यात आला आहे.

चिपळे गावातील अत्यंत धोकादायक असलेला लाइटचा पोल खराब परिस्थितीत असलेला निदर्शनास आला असता भाजप युवा नेते विश्वजीत पाटील यांनी महावितरणचे सहायक अभियंता रत्नाकर जाधव यांच्या ते निदर्शनास आणून दिले. त्यांनी काही दिवसांतच मुख्य अभियंता बैकर यांच्या मार्गदर्शनाने तो पोल बदलून नवीन बसवण्याच्या सूचना दिल्या.

सहाय्यक अभियंता रत्नाकर जाधव, बायो क्षेत्र कामगार प्रदीप पाटील व भोसले यांच्या उपस्थितीत काम पूर्ण करून नवीन पोल बसविण्यात आले. या वेळी विश्वजीत पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. याबद्दल विश्वजीत पाटील यांचे कौतुक होत आहे.

## पनवेल परिसरातील टपऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रात गुटखा, सुगंधित तंबाखू, पान मसाला यांच्या विक्रीस बंदी असतानाही बेकायदेशीरपणे अशा प्रकारे विक्री करणाऱ्या पनवेल परिसरातील आठ पान टपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभाग पेणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत गुटखा, सुगंधित तंबाखू व पान मसाला हस्तगत केला गेला आहे.

शहरातील गांधी हॉस्पिटल जवळील विविध ठिकाणच्या पान टपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन अधिकारी विक्रम निकम व त्यांच्या पथकाने या आठ जणांवर कारवाई करून त्यांच्या कडून जवळपास साडे तेवीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हातगत करून त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे.



**उरण : लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी जय गोपीनाथ प्रतिष्ठान तालुका अध्यक्ष अर्जुन डोंगरे, मनसे युवा नेते दत्ता ढेरे, जय भगवान ग्रुपचे अध्यक्ष प्रमोद डोंगरे, जय गोपीनाथ प्रतिष्ठान सदस्य सोमीनाथ हुगे, कामगार नेते गणेश केदार, जयदीप पोटे, अनिल खताळ, मोरे साहेब अविनाश शेडगे आदी उपस्थित होते.**

## काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये इनोव्हेशन चॅलेंज रायगड जिल्हा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रतिभा आणि नवोपक्रम यांचे प्रभावी मिश्रण दिसून आले. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीने आयोजित केलेला हा कार्यक्रम अंजुमन-इ-इस्लामच्या नवीन पनवेल येथील काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये झाला. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून २६ नवसंशोधक सहभागी झाले होते.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, पनवेलचे तहसीलदार विजय पाटील आणि सन्माननीय अतिथी रायगड जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त अमृता पवार यांनी त्यांची माहिती सांगून सहभागींना प्रेरित केले. 'एआयकेटीसी'चे संचालक डॉ. रमजान खाटिक यांनी विद्यार्थ्यांना कॅम्पस आणि अंजुमन-इ-इस्लाम या त्याच्या पालक संस्थेचे विहंगावलोकन दिले. या कार्यक्रमाला स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे डीन डॉ. राजेंद्र मगर, स्कूल ऑफ फार्मसीचे डीन डॉ. शारिक सय्यद, स्कूल ऑफ आर्किटेक्चरचे डीन प्रा. राज म्हात्रे, डी फार्म विभागाचे प्रमुख प्रा. अबुसुफियान शेख, आणि बिझनेस इनक्युबेशन सेंटरचे प्रमुख प्रो. अब्दुल माजिद अन्सारी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम अंजुमन -ए-इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अकील हाफीज अंजुमन-ए-इस्लाम, नवी मुंबई शिक्षण समूहाचे एकझ्युकेटिव चेअरमन बुरहान हारीस, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. रमझान खाटीक यांच्या समर्थन, प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फ्री हेल्मेट फॉर लाईफ कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १२) अध्ययन अध्यापन व विस्तार विभाग तसेच युनायटेड वे मुंबई (नॉन गव्हर्मेंट ऑर्गनायझेशन) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील लायसनप्राप्त विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी फ्री हेल्मेट फॉर लाईफ या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी हेल्मेटचा वापरा विषयी जागरूकता निर्माण व्हावी. सुमारे नवी मुंबईतील सुमारे सात महाविद्यालयांतील १५० विद्यार्थी व विद्यार्थिनींना फ्री हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वात कार्यक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. महेश धायगुडे, समन्वयक अध्ययन अध्यापन व विस्तार विभाग यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख, डॉ. फारुक शेख, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. योगिता पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.






**पनवेल : भाजपचे कळंबोली शहर सरचिटणीस संजय दोडके यांचे वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी अभीष्टचिंतन केले. या वेळी जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, संदेश सांगळे, सचिन आदमाने उपस्थित होते.**

**उरण : भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे उत्तर रायगड माजी जिल्हाध्यक्ष जसीम गॅस यांना वाढदिवसानिमित्त भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मावळ लोकसभा मतदारसंघाचे संयोजक सय्यद अकबर, भाजप उरण तालुका अध्यक्ष रविशेठ भोईर, अ‍ॅड. महेबूब पटेल यांनी शुभेच्छा दिल्या.**



## संपादकीय

# नंदनवनाची मुक्तता

जम्मू-काश्मीरच्या जनतेने एकदाचा सुटकेचा नि:श्वास सोडला असेल, कारण पृथ्वीतलावरील या नंदनवनाच्या मुक्तीच्या विरोधात अनेक वर्षे कोर्टकज्जे झाले. अखेर सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मीरची कायद्याच्या कचाट्यातून एकदाची मुक्तता केली आहे.

**जम्मू-काश्मीरला स्वायत्तता देणारे भारतीय राज्य घटनेतील कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने चार वर्षांपूर्वी घेतला. त्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी शिक्कामोर्तब केले. न्यायालयाच्या घटनापीठाच्या सुस्पष्ट निर्णयामुळे फक्त भारतीय जनता पक्षाचेच नव्हे; तर सगळ्या भारतवासीयांचेच स्वप्न साकार झाले आहे. जम्मू-काश्मीर खोऱ्यात आता विकासाची गंगा खऱ्या अर्थाने वाहू लागेल. जनसंघाची स्थापना १९५१मध्ये झाली, तेव्हा संघाचे ज्येष्ठ नेते आणि संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी काश्मीरला देण्यात आलेल्या स्वायत्ततेच्या विरोधात आंदोलन छेडले होते. 'एक राष्ट्र, एक निशान, एक विधान' अशी त्यांनी दिलेली घोषणा देशभरात दुमदुमली होती. चार वर्षांपूर्वी ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यासंबंधातील विधेयक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत मांडले. तेव्हाही त्यांनी डॉ. मुखर्जी यांच्या घोषणेचे स्मरण करून दिले होते. अर्थात, काश्मीर खोऱ्याला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मोदी सरकारचा हा प्रयत्न सहजासहजी तडीला गेला नाही. काँग्रेससह अनेक पक्षांचे हितसंबंध काश्मीरला मिळालेल्या विशेष दर्जामध्ये गुंतलेले होते. त्यांनी मोदी सरकारच्या या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयामध्ये अनेक याचिका केल्या होत्या. प्रदीर्घ सुनावणीनंतर सोमवारी त्यावर निकाल देताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायाधीशांच्या पीठाने जम्मू-काश्मीरची स्वायत्तता रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला वैध ठरवले. कलम ३७० हे तात्पुरते कलम होते असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. जम्मू-काश्मीर आणि लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केंद्र सरकारने त्यावेळी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णयदेखील उचलून धरला. तथापि, ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी तेथे निवडणुका घ्याव्यात असे निर्देशही केंद्र सरकारला दिले आहेत. केंद्र सरकारच्या कलम ३७० रद्द ठरवण्याच्या निर्णयास विरोध करताना मोठे कायदेशीर युक्तिवाद झाले, पण विरोधकांचे सगळेच युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावले. पाच न्यायमूर्तींच्या पीठाने हा निकाल एकमताने दिला ही लक्षात घेण्याजोगी बाब आहे. असे असले तरी न्यायमूर्ती एस. के. कौल यांनी निकालपत्राला आपले स्वतंत्र जोडपत्र लावले. त्यामध्ये तीन दशकांपूर्वी काश्मिरी पंडितांचा जो नरसंहार झाला, त्याचा उल्लेख आहे. या नरसंहारात हजारो काश्मिरी पंडित प्राणांस मुकले आणि काही देशोधडीस लागले. यापैकी अनेकांना आपल्या मायभूमीत पाऊल टाकता आले नाही. काश्मिरी पंडितांच्या पुनर्वसनासाठी मोदी सरकारने सर्वंकष कार्यक्रम हाती घेतला आहे. तथापि, या दुर्दैवी स्थलांतरितांवरील अन्याय दूर करण्यासाठी स्वतंत्र आयोग नेमावा अशी सूचना न्या. कौल यांनी आपल्या जोडपत्रात केली आहे. ती स्वागतार्हच आहे. मोदी सरकारचा सर्वोच्च न्यायालयातील हा विजयदेखील ऐतिहासिकच म्हणावा लागेल. दुर्दैवाने काँग्रेसची री ओढणाऱ्या काही माध्यमांच्या ही बाब पचनी पडलेली दिसत नाही. इतक्या मोठ्या निर्णयाचे वृत्तांकन माध्यमांमध्ये त्रोटकच झाले हे दुर्दैव आहे. मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला काँग्रेसने कोर्टात आव्हाने दिली, परंतु प्रत्येक वेळेला त्यांच्या पदरी पराभवच पडला. फक्त काश्मीरच नव्हे; तर संपूर्ण देशाला समाधान देणारा हा निर्णय आहे.**

# थिएटर मरता नही!



खबरबात
नितीन देशमुख

विजय तेंडुलकर गेल्यानंतर पृथ्वी थिएटरमध्ये एक सेमिनार होते की, थिएटर मर रहा है. त्या वेळी बी. व्ही. कारंजे म्हणाले होते, क्या होता है. थिएटर मरता नही. थेएटर तो बहुत युग है. फिल्म आया, टेलिव्हीजन आया, सबकुछ आया... जब तक दो इंसान एक दुसरे के साथ बात करते है तब तक थिएटर नही मरेगा. वो कुछ देर के लिए सो जाता है, पर उसे जगानेवाले पैदा होता है, उसकी की राह देखो. हे खरे असल्याचे आपल्याला पनवेलमध्ये अटल करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादमुळे पुन्हा एकदा दिसून आले.

पनवेल शहराला असलेला सांस्कृतिक वारसा मराठी रंगभूमीच्या विकासासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पनवेल शाखा जपण्याचा प्रयत्न करताना नेहमीच दिसते. त्यामुळेच पनवेलमध्ये असलेल्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बाळवंत फडके नाट्यगृहात नाटकांना पनवेलकरांचा मिळणारा प्रतिसाद नेहमीच चांगला असलेला आपल्याला पाहायला मिळतो. पनवेलकरांच्या या नाटक प्रेमामुळेच अटल करंडक स्पर्धा किंवा हौशी मराठी नाट्य स्पर्धा असो त्यासाठी पनवेलला पहिली पसंती दिली जाते.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे सुरू रहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेच्या माध्यमातून सन २०१४पासून पनवेलमध्ये अटल करंडक या दर्जेदार एकांकिका स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

या स्पर्धेला सर्व स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. त्यामुळेच अभिनेते, लेखक व दिग्दर्शक संजय मोने यांनी, आयोजकांना खरेच काही तरी करावे असे वाटते म्हणून ही स्पर्धा भरवली जाते. त्यामुळे दहा वर्षात त्याचा आलेख वाढता आहे. आपल्याकडे सांस्कृतिक क्षेत्रात पाच-सात वर्षांत ढासळायला सुरुवात होते. इथे दिवसन् दिवस चांगला-चांगला होत आहे. इथे स्पर्धकात दिसणार जोश जुन्या काळाची आठवण करून देणारा आहे. त्यामुळे साहित्यिक भूगोल, आठवणींचा इतिहास, वेळ आणि शिस्त याबाबतचे नागरिक शास्त्र या स्पर्धेतून पाहायला मिळत असल्याचे मत स्पर्धेनंतर व्यक्त केले. या स्पर्धेला मिळत असलेल्या वाढत्या प्रतिसादामुळे आणि कलाकार व रसिकांच्या मागणीमुळे ही स्पर्धा कोकण व मुंबईपुरती मर्यादित न ठेवता स्पर्धा राज्यस्तरीय करण्यात आली. यंदा महाराष्ट्रात स्पर्धेची सुरुवात एलिमेशन राऊंडने झाली. १२५ एकांकिकांमधून २५ एकांकिका महाअंतिम फेरीसाठी निवडल्या गेल. महाअंतिम फेरी पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ८ ते १० डिसेंबर रोजी रंगली. या महाअंतिम फेरीचे परीक्षण म्हणून अभिनेते लेखक व दिग्दर्शक संजय मोने, प्रसिद्ध अभिनेते विजय पाटकर, लेखक व दिग्दर्शक राजन ताम्हाणे यांनी केले. स्पर्धेसाठी ब्रँड अँबेसिडर म्हणून प्रसिद्ध सिनेअभिनेते अजिंक्य ननावरेची निवड करण्यात आली होती

या राज्यस्तरीय स्पर्धेत एकाहून एक सरस अशा एकांकिका सादर होत असल्याने बहुमानाचा अटल करंडक यंदा कोण पटकावणार याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली होती. ढिंग टँग, ढिटँग (ढ मंडळी कुडाळ), खुदिराम (स्वर्ण पटकथा, क्राऊड), टोपरं (नाट्यस्पर्श आणि भवन्स कॉलेज, अंधेरी), उणिवांची गोष्ट (ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे), अम्मा (निर्मिती, वसई) आणि नारायणास्त्र (नटवर्य रंगमंच, विरार) यांच्यामध्ये चुरस होती. तीन दिवस पहिल्या एकांकिकेपासून शेवटच्या एकांकिकेपर्यंत बसून रहाणारे नाट्यरसिक प्रेक्षक आणि स्पर्धक यांच्या मनात परीक्षकांचा निकाल येईपर्यंत धाकधूक होती. अखेर रात्री ९.४५ वाजता रंगमंचावर अटल करंडक आला आणि नयनरम्य फटाक्यांच्या आतषबाजीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजेत्या एकांकिकेचे नाव जाहीर करताच कुडाळच्या ढ मंडळी टीमने एकच जल्लोष करीत रंगमंचावर धाव घेतली. या स्पर्धेच्या अनुषंगाने महत्वपूर्ण अशा यंदाच्या गौरव रंगभूमी पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. मोहन आगाशे यांनी आजच्या तरुण कलाकारांना मार्गदर्शन करताना, हे चक्र आहे आज तिथे बसले आहेत ते उद्या इथे बसणार आहेत. मीसुद्धा कॉलेजमध्ये असताना पुण्याला पुरूषोत्तम करंडक स्पर्धेत भाग घेत असे. त्यातूनच घडलो. तरुण कलाकारांनी आपली आवड व आपली क्षमता काय आहे ते ओळखणे खूप महत्त्वाचे असल्याचे सांगून प्रसिद्धी आपल्यापर्यंत फारशी पोहचू देऊ नका. ती बाहेरच राहू द्या. प्रसिद्धी आहे म्हणून काही करू नका. नाहीतर वाईट गोष्टी घडतात. त्यांनीपण प्रसिद्धी मिळते. म्हणून ती आपल्या मागेच आली पाहिजे. तिने आपल्या पुढे जाऊन नाही चालणार. आपण ज्या गोष्टी करतो त्या आवडीने केल्या की प्रसिद्धीचा त्रास होत नाही. प्रसिद्धीसाठी काही करू नका, असा मोलाचा सल्ला दिला.

अटल करंडक स्पर्धा प्रमुख असलेले पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नाट्य परिषद पनवेल शाखा प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अभिनेते भरत सावले, सहकार्यवाह स्मिता गांधी, कोषाध्यक्ष अमोल खेर, वैभव बुवा, गणेश जगताप, चिन्मय समेळ, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे थिएटर कुछ देर के लिए सोया था, लेकीन अटल करंडकने उसे जगाया, असेच म्हणावे लागेल.





## बदलते तंत्रज्ञान

# गुगलने प्ले स्टोअरवरून काढून टाकले १७ ॲप्स




सोशल मीडियाच्या रोजच्या वापरातील अनेक ॲप्स आपण गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करून घेतो, पण यात अनेक असे ॲप्स असतात जे युजर्ससाठी घातक असतात. त्यामुळे गुगल कंपनीने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारतीय युजर्सना टार्गेट करणारे काही ॲप्स गुगल प्ले स्टोअरमधून काढून टाकले आहेत.

गुगलने प्ले स्टोअरवरून १७ ॲप्स काढून टाकले आहेत, जे भारतीय वापरकर्त्यांना लोन आणि डेटा हार्वेस्टिंगसह टार्गेट करत होते. संशोधकांनी स्पायलोन ॲप्स म्हणून डब केलेले हे ॲप कायदेशीर कर्ज पुरवठादारांवर विश्वास ठेवलेल्या युजर्सचा फायदा घेण्यासाठी डिझाईन केले आहे. या ॲप्सने वापरकर्त्यांना त्यांचा वैयक्तिक डेटा ॲक्सेस करण्याची परवानगी देण्यासाठी सांगून फसवले. एकदा हा ॲप तुम्ही इन्स्टॉल केला की तुमच्या फोनमधील कॉन्टॅक्ट लिस्ट, एसएमएस, फोटो आणि ब्राउझिंग हिस्टरीमधील विशिष्ट माहिती हे हॅकर्स चोरून घेतात तसेच या डेटाचा वापर नंतर ब्लॅकमेल करण्यासाठी आणि युजर्सना जास्त व्याजदरासह कर्जाची परतफेड करण्यासाठी त्रास देण्यासाठी करण्यात येतात.हे ॲप्स भारत, थायलंड, व्हिएतनाम, मेक्सिको, इंडोनेशिया, कोलंबिया, इजिप्त, केनिया, पेरू, फिलीपिन्स, सिंगापूर आणि नायजेरिया आदी देशांमध्ये कार्यरत होते. संशोधकांचा असा विश्वास आहे की हे ॲप्स प्ले स्टोअरवरून काढून टाकण्यापूर्वी १२ दशलक्षाहून अधिक लोकांनी डाउनलोड केले होते.

स्पायलोन ॲप्सने वापरकर्त्यांना डाउनलोड करण्यासाठी प्रेरित केले. एकदा ॲप इन्स्टॉल केल्यावर या ॲप्सना नकळत मंजूर झालेल्या परमिशन्सद्वारे हॅकर्सना वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती मिळते. नंतर या माहितीचा वापर युजर्सना परतफेडीच्या कालावधीवर जास्त व्याजदर देण्यासाठी ब्लॅकमेल केले जाते, ज्यामुळे परतफेड जवळजवळ अशक्य असते. हे ॲप आर्थिक सहाय्याची गरज असलेल्या लोकांना टार्गेट करतात.

गुगलने असे म्हटले आहे की, वापरकर्त्यांना अशा ॲप्सपासून संरक्षण करण्यासाठी गुगल नेहमीच प्रयत्नशील राहील. गेल्या वर्षभरात प्ले स्टोअरवरून २००हून अधिक स्पायलोन ॲप्स काढून टाकले आहेत तसेच आता पुन्हा १७ ॲप्ससुद्धा काढून टाकले आहेत.

# भाजप नेते स्व. मनोहर पर्रीकर



निमित्त

गोव्याचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री मनोहर परिकर यांचा आजच्याच तारखेला १९५५मध्ये गोव्यातील म्हापसा येथे जन्म झाला होता. साधी राहणी व उच्च विचारसरणीचे मूर्तिमंत उदाहरण असलेले परिकर सर्वांना नेहमी आपल्यातलेच एक वाटत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, भाजपचा सामान्य कार्यकर्ता, गोव्याचे मुख्यमंत्री ते देशाचे संरक्षणमंत्री असा परिकर यांचा थक्क करणारा प्रवास होता. यशाची अनेक शिखरे गाठूनही त्यांनी त्यांच्यातला 'कॉमन मॅन' अखेरच्या श्वासापर्यंत जपला.

मनोहर परिकर यांचे शालेय शिक्षण लोयोला हायस्कूलमध्ये झाले. १९७८मध्ये त्यांनी आयआयटी मुंबईतून इंजिनीअरिंगमध्ये पदवी मिळवली. राजकारणात येण्याआधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे ते ओढले गेले. आरएसएसच्या उत्तर गोवा युनिटमध्ये ते सक्रिय होते. त्यानंतर त्यांनी पूर्णवेळ राजकारणात पाऊल ठेवले आणि कधीही मागे वळून पाहिले नाही. १९९१मध्ये उत्तर गोवा लोकसभा मतदारसंघातून ते निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. त्यानंतर १९९४मध्ये त्यांनी पणजी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि दणदणीत विजय मिळवला. त्यानंतर या मतदारसंघातून सलग चारवेळा ते निवडून आले. गोव्याच्या राजकारणात याआधी अशी किमया कोणत्याही अन्य नेत्याला साधता आली नव्हती. २०००मध्ये परिकर सर्वप्रथम मुख्यमंत्री झाले. सामान्य गोवेकरांचा मुख्यमंत्री अशी त्यांची प्रतिमा होती. ते स्कूटीवरून मुख्यमंत्री कार्यालयात जायचे. स्कूटीवरून जातानाचे परिकरांचे अनेक फोटो तेव्हा व्हायरल झाले होते. मुख्यमंत्री झाल्यानंतरही परिकर पणजीतील शासकीय निवासस्थानी न राहता म्हापसा येथील वडलोपार्जित घरात राहायचे. विशेष म्हणजे देशातील पहिले आयआयटी पदवीधर मुख्यमंत्री हा बहुमान परिकर यांना मिळाला.

भाजपची गोव्यात संघटनात्मक पातळीवर बांधणी करून पक्षाला सत्तेपर्यंत पोहचवण्यात परिकर यांचा सिंहाचा वाटा राहिला. जून २००२मध्ये गोवा विधानसभा बरखास्त करण्यात आल्यानंतर पुन्हा निवडणुका झाल्या आणि भाजपने सर्वात मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली. छोटे पक्ष आणि एका अपक्ष आमदाराच्या पाठिंब्याने परिकर पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यानंतर परिकर यांनी घट्ट पाय रोवले. २०१२च्या विधानसभा निवडणुकीआधी परिकर यांनी जनसंपर्क यात्रा काढत जनतेशी संवाद साधला. या यात्रेचे फळ परिकर आणि भाजपला मिळाले व २१ आमदारांसह पूर्ण बहुमतातले भाजपचे सरकार गोव्यात विराजमान झाले. निवडणुकीनंतर राज्यात पेट्रोलवरील व्हॅट हटवण्याचा महत्त्वाचा निर्णय परिकर यांनी घेतला. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत गोव्यात ११ रुपयांनी स्वस्त पेट्रोल मिळू लागले. परिकर यांच्या या निर्णयाची देशभरात चर्चा झाली. दयानंद सामाजिक सुरक्षा योजना, सायबरएज योजना, सीएम रोजगार योजना या माध्यमातून परिकर यांनी गोवेकरांच्या हृदयसिंहासनावर राज्य केलं. त्यामुळेच गोव्याला सलग तीन वर्षे योजना आयोगाने 'बेस्ट गव्हर्निंग स्टेट' हा बहुमान दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोव्हेंबर २०१४मध्ये परिकर यांना गोव्यातून दिल्लीत पाचारण केले आणि त्यांच्या हाती देशाच्या संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली. परिकर यांच्याच कार्यकाळात उरी हल्ल्याचा बदला म्हणून सप्टेंबर २०१६मध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये धडक देऊन भारतीय जवानांनी सर्जिकल स्ट्राइक घडवला. मार्च २०१७मध्ये परिकर यांनी संरक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि ते चौथ्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री झाले. फेब्रुवारी २०१८मध्ये परिकर यांना स्वादुपिंडाचा कॅन्सर असल्याचे निदान झाले आणि या आजाराशी चाललेली त्यांची झुंज अखेर थांबली. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**खालापूर : वेध सह्याद्रीतर्फे समरभूमी उंबरखिंड येथे किल्ले स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी उंबरखिंड येथे मोजक्या मावळ्यांसह मुघलांवर विजय मिळवला होता. त्याबद्दल विद्यार्थ्यांना माहितीही देण्यात आली.** (छाया : विनित जाधव)

## आरोग्य प्रहर

# काळी द्राक्षे खा आणि 'या' त्रासांपासून दूर राहा!

बाजारात आपल्याला दोन प्रकारची द्राक्षे पाहायला मिळतात ती म्हणजे हिरवी व काळी. या दोन्ही प्रकारच्या द्राक्षांची चव वेगळी असते. त्यातील काळी द्राक्षे ही आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात, असे म्हटले जाते. त्यामुळे हिरव्या द्राक्षांच्या तुलनेत काळ्या द्राक्षांची किंमतही जास्त असते. आंबट-गोड चवीबरोबरच ही द्राक्षे आरोग्यास आवश्यक पौष्टिक फायदे देतात. काळ्या द्राक्ष खाण्याचे नेमके फायदे काय आहेत या विषयावर उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांनी माहिती दिली आहे.



आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांच्या मते, काळी द्राक्षे शरीरास आवश्यक व पौष्टिक घटकांचे पॉवरहाऊस मानले जाते. या द्राक्षांमध्ये विविध आरोग्यदायी घटक आहेत. यात कॅलरीज, कार्बोहायड्रेट, फायबर, साखर, प्रोटीन, फॅट्स, व्हिटॅमिन सी, ए, के, बी-कॉम्प्लेक्स (इ१, इ२, इ३ व इ५), कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॉपर, मँगनीज, अँटिऑक्सिडंट्स असतात. याशिवाय काळ्या द्राक्षांमध्ये पॉलिफेनॉल, फ्लेव्होनॉइड्स व रेझवेराट्रोलसह विविध अँटिऑक्सिडंट्स घटक असतात; जे एकूण आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात.

काळी द्राक्षे खाण्याचे विविध आरोग्यदायी फायदे आहेत. काळ्या द्राक्षांमध्ये पोटॅशियम अँटीऑक्सिडंट्स, विशेषत: रेझवेराट्रोल असते, जे हृदयासाठी चांगले असते. हे घटक हृदयाचे आरोग्य निरोगी राखण्यास आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या रोगांचा धोका कमी करण्यास मदत करतात. काळ्या द्राक्षांमधील फायबरमुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे बद्धकोष्ठता, पोटासंबंधित विकार टाळण्यास मदत होऊ शकते. काळ्या द्राक्षांतील जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स त्वचेचे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करतात; तसेच कोलेजन निर्मितीला प्रोत्साहन देऊ शकतात. त्याचप्रमाणे त्वचा उजळण्यासही मदत होते. काळ्या द्राक्षांमधील काही संयुगांमध्ये दाहकविरोधी गुणधर्म आहेत. त्यामुळे ते जळजळ कमी करून, रक्तवाहिन्यांचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत करतात. काळ्या द्राक्षांतील पोटॅशियमचे प्रमाण रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि ते हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीच्या आरोग्याला चालना देण्यासाठी मदत करते.

# रस्त्यावर मच्छी विकणाऱ्यांमुळे वाहतूक कोंडी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड-जंजिरा नगरपरिषदेने लाखो रुपये खर्च करून मच्छीमार्केट बांधले आहे. तरीही काही मच्छीविक्रेते महिला बिंधास्तपणे रस्तावर मच्छी विक्री करत असल्याने वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः शनिवार व रविवार पर्यटकांची खूप मोठी गर्दी असते. अश्यावेळी जंजिरा किल्ल्यावर जाण्याचा मार्ग हाच असल्याने येथे वाहनांची मोठी गर्दी होत असते.

मुरुड पर्यटन क्षेत्र असुन शहरातील मच्छीमार्केट जवळील मुख्य रस्त्यावरुन राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक आपल्या वाहनातून ये-जा करित असतात, मात्र याच रस्तावरून जाताना मच्छीविक्रेते महिलाचा सामना करावा लागतो. मासळी विक्रेत्या महिला आपली मासळीची टोपली रस्तावरुन साईटला घ्यावयास मागत नाहीत. रस्तावरच ठाणमाडुन बसतात.

वाहन आले तरी रस्तावरून हटता हटत नाही त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असल्याने पर्यटकांना या वाहतूकीचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी प्रशासनाने उपाययोजना करून पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

मुरुड नगर परिषदेने शनिवार व रविवार कर्मचारी नियुक्त करून स्थानिक नागरिक व पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्वच स्थरातून होत आहे.


(छाया : संजय करडे)

## निजामपुरात घरफोडी; सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी चोरी करून घरातील ६५ हजार रुपयांचे दागिने चोरून तो फरार झाला आहे. ही घटना शनिवार (दि.९) दुपारी १२:३० वाजता ते रविवार (दि. १०) सकाळीच्या दरम्यान फिर्याद यांच्या राहते घरी घडली.

याबाबतची फिर्याद मारुती नामदेव काकरे (वय ५५, मूळ रा. माळहिपरगा जि. लातूर सध्या रा. सोमजाई अपार्टमेंट निजामपूर ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी मारुती नामदेव काकरे यांच्या बंद घराच्या दरवाजाचा टाळा कोणत्यातरी साधनाने तोडून दरवाजा उघडून त्यावाटे आत घरामध्ये प्रवेश करून बेडरूममधील एकूण ६५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे. या गुन्ह्याप्रकरणी अज्ञात चोरट्या व्यक्तीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास सुरू आहेत.

## मोरबे धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर पुढील आठवड्यात चर्चा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



मोरबे धरणग्रस्त जनतेला स्वतःच्या न्याय हक्क मागण्यांसाठी कोकण आयुक्त यांच्या कोकण भवन कार्यालयासमोर १२ डिसेंबरपासून उपोषणाला बसणार असल्याने जिल्हाधिकारी यांनी १९ डिसेंबर रोजी धरणग्रस्तांना चर्चेला पाचारण केले आहे. या बैठकीतून मार्ग न निघाल्यास आठ गावे व सात वाड्यातील धरणग्रस्त आपला लढा अधिक तीव्र करणार असल्याचे मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष जगन्नाथ धर्मा पाटील यांनी सोमवारी सायंकाळी उशीरा झालेल्या बैठकीत सांगितले.

दरम्यान, खालापूर तालुक्यात असणारे मोरबे धरण हे नवी मुंबईला पाणी पुरवठा करणारे सर्वांत मोठे धरण असून राज्यातील एका स्वायत्त संस्थेच्या मालकीचे म्हणजे नवी मुंबई महानगरपालिका यांच्या मालकीचे आहे. आठ महसुली गावे आणि सात आदिवासी वाड्या यांच्या जमिनी शासनाने कवडीमोलाने संपादित केल्या आहेत. नवी मुंबई, जेएनपीटी, सिडको यांना पाणी पुरवठा करण्यासाठी १९८५ साली या धरणाला मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम २०१३ हा न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन कायदा लागू करण्यासाठी मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीच्यावतीने १९ डिसेंबरला जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक होवून निर्णय न झाल्यास धरणग्रस्तांच्या जागेतून मुंबईला जात असणारा पाणीपुरवठा थांबवू असा इशारा अध्यक्ष जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष परशुराम मिरकुटे, सचिव योगेश प्रबळकर, उपाध्यक्ष अंकुश वाघ, शुभम निकालजे यांनी दिला आहे.

> **मोर्बे प्रकल्पग्रस्त पुनर्वसन २०१३च्या कायद्याप्रमाणे भुसंपादन व पुनर्वसन करावे शिवाय सिडको म्हाडा येथील पंतप्रधान आवास योजनेत घरे मोर्बे प्रकल्पग्रस्तांना द्यावी.**
> **-जगन्नाथ पाटील, अध्यक्ष, मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त कृती समिती**

> **३५ वर्षे धरणग्रस्तांसाठी लढा सुरू आहे. १९ तारखेला निर्णय लागला नाही तर धरणाचे पाणी बंद करू.**
> **-योगेश प्रबळकर, सचिव**

## माणगावमध्ये मुलीचे अपहरण

**माणगाव :** माणगाव बसस्थानक येथून एका अल्पवयीन १५ वर्षीय मुलीला आरोपीने फूस लावून कोठेतरी पळवून नेल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना ७ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची फिर्याद अपरहित मुलीच्या नातेवाईकांनी माणगाव पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. ११) दिल्यावर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी यांची १५ वर्षांची अपरहित नात तिचे वर्णन उंची अंदाजे १५१ सेमी, रंग गोरा, अंगाने मध्यम, केस काळे लांब, अंगात नेसूस लाल रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात काळी चप्पल, पाठीवर काळी बॅग हिला आरोपी सागर सखाराम कोळी (रा. पाथरशेत आदिवासीवाडी ता. रोहा) याने तिच्या अज्ञातपणाचा फायदा घेऊन तिला फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आघाव हे करीत आहेत.

## श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमी शेडची दूरवस्था

### डागडुजी करण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथे असलेल्या मठाच्या स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था झाली असून ही शेड पूर्णपणे मोडकळीस आली आहे. शेडचे छप्पर खाली आले असून त्या ठिकाणी मोठमोठी झाडे वाढलेली पाहायला मिळतात. मागील दोन वर्षांपासून या शेडची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने या शेडची डागडुजी करून अथवा नवीन बसवून अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा.

नुकतेच श्रीवर्धन समुद्रकिनारी असलेल्या धुप प्रतिबंधक बंधार्याची दुरुस्ती करण्यात आली व सुशोभीकरण करण्यात आले. हे काम सुरू असताना संबंधित ठेकेदाराने अनेक दिवस आपले सिमेंट या शेडमध्ये ठेवले होते. त्या ठेकेदाराकडून सदरची शेड दुरुस्त करून घेता येणे शक्य होते. परंतु तसेही केले नाही.

या स्मशानभूमीमध्ये श्रीवर्धनला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील व मेटकर्णी परिसरातील नागरिक देखील अंत्यविधी करण्यासाठी येत असतात. शहरातील सर्वांत जास्त अंत्यविधी याच ठिकाणी होतात. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने सदर शेडची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.



## खालापुरात पाणीपुरवठा योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

जल जीवन मिशन अंतर्गत खालापूर तालुक्यात ९२ योजना मंजुर असूनही कामे प्रभावीपणे राबविण्याची मागणी येथील जनतेतून होत आहे. गुणवत्तापूर्ण काम करण्याच्या दृष्टीने ठेकेदारांना योग्य त्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालापूरला येऊन दिल्या पाहिजेत, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

जनतेला स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे. तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा, यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकार यांच्या मार्फत ही जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत आहे. देशातील ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत हर घर,नल से जल या योजनेमधून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे, मात्र ठेकेदार आणि शासन असा संबंध असल्याने ग्रामस्थ व ग्रामपंचायत दुर्लक्ष करताना दिसत असून योजनेसाठी जागा उपलब्ध करून देणे, स्थानिक अडचणी सोडविणे, कामाची गुणवत्ता बघणे,प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजने च्या कामांची माहिती घेणे असे होताना



दिसत नाही. कारण यात ग्रामपंचायतीला घेण्यात आले नाही.

उप अभियंता संतोष चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता कामे काहीशी धीम्या गतीने सुरू असल्याचे कबूल करून, मी स्वतः सर्व कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहे, काम जलद गतीने व गुणवत्ता प्रमाणे होईल याकडे लक्ष देत आहे, असे सांगितले.

## नांदले येथे आरोग्य तपासणी शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीतील नांदले येथे अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या वेळी आगरदांडा ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर, उपसरपंच संतोष पाटील, शिक्षक वृंद फंदे, दिघी पोर्ट लिमिटेडचे चंदर देव संब्याल (संरक्षण विभाग), राजपुरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच इस्माईल सिद्दीकी ग्रामस्थ उपस्थित होते. मुंबई -विलेपार्ले येथील शल्यचिकित्सक डॉ. मयंक प्रधान, स्त्रीरोग तज्ञ डॉ. चेतना प्रहेली, त्वचारोग तज्ञ डॉ.मारुती मोहन जराग यांच्या टिमने आगरदांडा-नांदले पंचक्रोशीतील १७९ लोकांची मोफत आरोग्य तपासणी केली. रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली.

स्थानिकांना गावातच आरोग्य सुविधा, मार्गदर्शन तसेच औषधोपचार मिळावेत. याउद्देशाने आयोजित शिबिरात डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात येथील दिव्यांग, अबाल वृद्ध तसेच ९०,९५ वयोगट मधील वृद्धांनीदेखील लाभ घेतला. दिघी पोर्टच्या माध्यमातून अदानी फाउंडेशनच्या उपस्थित वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी अदानी फाउंडेशन माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारचे आरोग्य संवर्धन उपक्रमाबाबत माहिती दिली.

औषध वितरण व्यवस्था नितीन चांदोरकर माणगाव यांनी केली होती. अदानी फाउंडेशनचे अवधुत पाटील आणि ग्राम सखी प्राजक्ता अडुळकर, प्रज्ञा कासारे, सुप्रिया चव्हाण यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## पेणमधील गणपती कारखानदारांची बैठक



**पेण : प्रतिनिधी**

पेणच्या गणरायाला जीआय मानांकन मिळाल्यामुळे गणपती कारखानदार व कारागीर यांच्यात उत्साहाचे वातावरण असून या पार्श्वभूमीवर पेणमधील गणपती कारखानदारांची बैठक रामेश्वर हॉल येथे घेण्यात आली.

या बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरलय्या, डॉ. अविनाश कुलकर्णी हे उपस्थित होते. या वेळी श्री. गणेश मूर्तिकार व व्यवसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत देवधर, उपाध्यक्ष किरण पाटील, सचिव सागर सदाशिव पवार, दीपक समेळ, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड आदींसह गणेश मूर्तिकार व व्यवसायिक कल्याणकारी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना जिल्हा उद्योग केंद्राचे हरलय्या यांनी सांगितले की, जिल्ह्यातील उद्योगाचा विकास व्हावा या दृष्टीने गणपती मूर्तिकारांचा ऐतिहासिक ठेवा असून आर्थिक, भौगोलिक, सामाजिक माहिती शासनाला पुरवून पेणच्या गणपतीला जी आय मानांकन प्राप्त झाले असून यामध्ये अनेकांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून यामध्ये डॉ. अविनाश कुलकर्णी यांचे कार्य मोलाचे ठरले आहे. या जीआय मानांकनाद्वारे गणपती व्यवसायिकाला एक वेगळी ओळख निर्माण झाली असून आता रायगड जिल्ह्यातील बिगर कृषि घटकात जीआय मानांकन प्राप्त झालेला व्यवसाय आहे.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, कारखानदारांनी आता एकजूट होणे गरजेचे असून शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून समूह लघु उद्योग द्वारा योजनेचा लाभ घेऊन आपला व्यवसाय वाढवायचा आहे. यासाठी केंद्र शासन व राज्य शासन मिळून ९५ टक्के अनुदान मिळते. जी आय मानांकन माध्यमातून आता पेणचे गणपती सांगून अनेक राज्यात गणपती मूर्तींची जी विक्री होते त्याला आळा बसणार आहे.

## किरवली येथे श्रमदानातून साकारला वनराई बंधारा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत कृषी विभागाच्या माध्यमातून किरवली येथील नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला. कृषी विभाग आणि तेथील कालभैरव माध्यमिक विद्यालय किरवलीच्या माध्यमातून वनराई बंधारा बांधण्यात आला.

किरवली येथून वाहणारा नाला हा उन्हाळ्यात आटत असतो आणि त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अडचणींचा ठरत असतो. त्यामुळे कृषी विभागाने त्या नाल्यावर वनराई बंधारा बांधून पाणी अडविण्याचा निर्णय घेतला. त्यास्तही कृषी विभागाला त्या ठिकाणी असलेल्या कालभैरव माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र बोराडे, साहेबराव सुर्यवंशी, कैलास ठोकळे, रघुनाथ देशमुख, दिलीप म्हसे या शिक्षकांसह सर्व विद्यार्थ्यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

साधारण ४० मीटर लांबीचा वनराई बंधारा त्या ठिकणी बांधण्यात यश आले आहे.

यासाठी तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, ग्रामपंचायत मधील माजी उपसरपंच संजय बडेकर, गावाचे पोलीस पाटील विवेक बडेकर तसेच स्थानिक ग्रामस्थ शरद पवार, शरद बडेकर, विश्वनाथ बडेकर तसेच शाळेचे सर्व शिक्षक आणि कृषी सहायक मंगेश गलांडे, नितीन भानवसे आदींनी श्रमदान केले.


(जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक, निविदा-०४१७/(प्र.क्र. २४७/१७) मोप्र-१/दि:-१८/१०/२०२३)

**निविदा सूचना**

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय

ई मेल पत्ता:- eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com, दूरध्वनी-०२१४३-२७८०११

**ई निविदा सूचना क्र. १३ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अनुभवी व सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | ई-निविदा उपलब्ध कालावधी | ई-निविदा उघडणे | जिओ टॅगिंग | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंबोली धरणाच्या सांडवा प्रणालीच्या मजबुती करणाचे काम | १,६७,३७,६६०/- | दिनांक १५/१२/२०२३ ते २९/१२/२०२३ | दिनांक ०१/०१/२०२४ | दिनांक २१/१२/२०२३ ते २८/१२/२०२३ | संदर्भित कामातील अनुभवी व सक्षम कंत्राटदार |

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.हेमप्रवि/लेशा-१/ई-निविदा सुचना /२३३७/२०२३**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड,**
**दिनांक :- ०६/१२/२०२३**

**सही/-**
**(इंजि. दि. का. राजभोज)**
**कार्यकारी अभियंता,**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली**
**ता. पेण जि. रायगड**

## निवडक

### नेरूळमध्ये कादंबरीचे प्रकाशन

**नवी मुंबई :** नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ तसेच भूमिपुत्र सामाजिक प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून करावे गाव येथील शाळेत नवी मुंबईतील साहित्यिक गजानन म्हात्रे यांच्या 'आठवणींच्या रंगीत चिमण्या' या कादंबरीचे नुकतेच प्रकाशन झाले. यापूर्वी म्हात्रे यांची 'खाडीवरची माडी' या कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. या कार्यक्रमाला साहित्यिक प्रमोद करणार, एल. बी. पाटील, कौमुदी गोडबोले, विनोद म्हात्रे, लेखक व कवी देविदास पोटे, प्राचार्य रत्नाकर तांडेल आदी उपस्थित होते.

### रसायनीत विद्यार्थ्यांचे लसीकरण

**रसायनी :** रसायनीतील महिला उद्योग मंडळ संचलित शिशु विकास आणि प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शनिवारी (दि. ९) लसीकरण करण्यात आले. पाच ते सहा वयोगटातील सीनिअर के. जी. व पहिलीतील ३० विद्यार्थ्यांना डांग्या खोकला, घटसर्प, धनुर्वात (डीपीटी बूस्टर) लस देण्यात आली. दहा ते अकरा वयोगटातील इयत्ता चौथी ते सहावीच्या १०० विद्यार्थ्यांना धनुर्वात व घटसर्प (टीडी) लस देण्यात आली. आरोग्यसेविका भारती पाटील, माधुरी म्हात्रे, दीपाली पाटील, आरोग्यसेवक जी. एच. भगत, महिला उद्योग मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, खजिनदार सुनीता कराड, सदस्या हर्षदा पालव, मुख्याध्यापक महादेव पाटील, शिशु विकासच्या मुख्याध्यापिका सुप्रिया गायकर यांच्यासह पालक उपस्थित होते.

### वाढदिवसानिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम



**उरण :** उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून, विद्या संकुलनात आपल्या आई-वडिलांची पवित्र स्मृती कायम प्रेरणा देत राहावी, यासाठी वडील स्वर्गीय परशुराम धाकू खारपाटील व आई स्वर्गीय ठकूबाई परशुराम खारपाटील यांची आठवण जपण्यासाठी विद्या संकुलनात त्यांचे अर्ध पुतळे बसविण्यात आले आहेत. त्याचे अनावरण पी. पी. खारपाटील कंट्रक्शन प्रा. लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पी. पी.खारपाटील व कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# बदलत्या हवामानामुळे आजार वाढले

## नवी मुंबईत सर्दी, खोकला, अंगदुखीचे रुग्ण अधिक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दुपारी उन्हाळा, संध्याकाळी गारवा अशा वातावरणातील बदलांमुळे आजारांचा तापही वाढला आहे. लहान मुलांमध्ये सर्दी, खोकला, दमा तसेच त्वचाविकारांशी संबधित तक्रारी वाढत्या आहेत. काही मुलांमध्ये घसादुखी, टॉन्सिल्स वाढल्यामुळे समस्या जाणवत आहे. कोरडा खोकला, सर्दी यांसह ज्येष्ठ नागरिकांमध्ये सांधेदुखीच्या तक्रारी दिसून येत आहेत.

सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांमध्ये या प्रकारच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. काही दिवसांपासून प्रदूषण आणि वाहतूक कोंडीमुळे या तक्रारींमध्ये भर पडली आहे. थंडीची सुरुवात झाली की हा त्रास वाढताना दिसतो. खासगी आणि सार्वजनिक रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या संख्येमध्ये दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढ झाली आहे, असे जनरल फिजिशियन डॉ. प्रतीक तांबे मोरे यांनी सांगितले.




**परस्पर औषधे घेऊ नका!**

आठवडाभरापेक्षा अधिक काळ सर्दी, खोकला राहिला तर वैद्यकीय उपचार सुरू करायला हवेत, असा सल्ला फिजिशिअन डॉ. प्रतीक तांबे यांनी दिला आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय परस्पर औषधे घेऊ नयेत.

**असे मिळवा आजारावर नियंत्रण**

- एसीचा वापर टाळा.
- गरम पाणी प्या, ताजे अन्न खा.
- उघड्यावरचे अन्नपदार्थ टाळा.
- प्रतिजैविकांचे सेवन वैद्यकीय सल्ल्याशिवाय करू नका.



काहीवेळा खोकला नियंत्रणात येत नाही, उलट तो वाढतो. त्यामुळे थंडीमध्ये होणाऱ्या या आजारांकडे दुर्लक्ष करू नका, असे मार्गदर्शन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे. हवेच्या खालच्या थरामध्ये स्थिर झालेल्या प्रदूषणामुळे डोळ्यांची जळजळ होण्यासह नाक व घसा खवखवतो. या वातावरणामध्ये ताप टाळण्यासाठी दरवर्षी लसीकरण करावे. लहान मुलांमध्येही लसीकरण चुकवू नये, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

यासोबतच त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय परस्पर औषधे घेऊ नका, असे आवाहन केले आहे.

# मोबाईल चोरणारा सराईत गुन्हेगार गजाआड

## दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह कामोठे पोलीस ठाणे, नेरूळ पोलीस ठाणे, सीबीडी पोलीस ठाणे, वाशी पोलीस ठाणे, कोपरखैरणे पोलीस ठाणे, एपीएमसी पोलीस ठाणे आदी ठिकाणी मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा कक्ष - २ पनवेलच्या पथकाने खांदेश्वर रेल्वे स्टेशकडून खांदा कॉलनी सिग्नलकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून त्याला जवळपास दीड लाखाच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.



मोबाईल चोरीच्या घटनामध्ये वाढ झाली होती याबाबत गुन्हे शाखा कक्ष - २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखालील पोलिसांच्या पथकाने या गुन्ह्यातील आरोपींचा गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेण्यास सुरुवात केली. या वेळी आरोपी खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडून खांदाकॉलनी सिग्नल कडे जाणाऱ्या रस्त्यावर येणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यानुसार संबंधित ठिकाणी सापळा रचून आरोपी नामे हमजा काले खान उर्फ सुजित बंगाली (वय २१, रा. नावडे) पुलाजवळ त्याला ताब्यात घेतले.

आरोपीने आत्तापर्यंत ११ मोबाईल चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्या कडून जवळपास दिड लाखाचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

# वाशिवलीत विविध विकासकामांचे भूमिपूजन

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यामधील वाशिवली येथे स्थानिक आमदार विकास निधीमधून दशरथ देऊ पाटील यांचा घरापासून ते डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयापर्यंत पुलासाठी २५ लक्ष उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी मधून मंजूर झाले असून सोमवारी (दि. ११) दुपारी १२ वाजता भूमिपूजनाचा कार्यक्रम झाला.

पुलाचे भूमिपूजन व नारळ फोडने प्रवीण मोरे, सुधीर ठोंबरे, महादेव गडगे व सुजाता पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या वेळी भाजपचे खालपुर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, वडगाव जिल्हा परिषद अध्यक्ष संदीप पाटील खालापुर तालुका कार्यकारी उपाधयक्ष किशोर देवघरे, वडगांवचे माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य महादेव गडगे, उपसरपंच सुजाता विश्वनाथ पाटील, माजी सरपंच जयप्रकाश पाटील, विश्वनाथ मारुती पाटील, दशरथ देहू पाटील, माजी सदस्य विलास पाटील बोरीवली, माजी उपसरपंच बंडू बडेकर, वाशिवली बूथ अध्यक्ष राम ठोंबरे, युवा मोर्चा पंचायत समिती अध्यक्ष संदेश मालकर, हिरू पाटील, सुरेंद्र पाटील, मंगेश पाटील, अतिश साळुंखे, जनार्दन शिवले, प्रशांत ठोंबरे, अतुल मालकर आदी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.



# नवी मुंबई महापालिकेच्या इआरपी प्रणालीची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये परस्पर समन्वय राहावा व नागरिकांना महापालिकेशी संबंधित सेवा विहित कालावधीत, कमीत कमी श्रमात सहजपणे उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने नवीन इआरपी (इंटरप्रायजेस रिसोर्स प्लॅनिंग) प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यवाही जलद पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी अधिक काटेकोर लक्ष द्यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिले.

विविध विभागांतील कामांचा आढावा घेताना त्यांनी विभाग प्रमुखांच्या बैठकीत इआरपी प्रणालीच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला व विभागांचा प्राधान्यक्रम ठरवून काम पूर्ण होईल तसतशा त्या त्या विभागांच्या सेवा कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश दिले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.




या बैठकीवेळी इआरपी प्रणालीत उपलब्ध सुविधांची आयुक्त राजेश नार्वेकर यांनी बारकाईने पाहणी केली व काही सेवा उपलब्धतेची कार्यवाही जाणून घेतली. सध्याची कार्यान्वित इआरपी प्रणाली अद्ययावत केली जात असून यामुळे मुख्यालय व विभाग कार्यालयांसह इतर विभाग यांच्याकरीता एकच सॉफ्टवेअर वापरले जाईल आणि सर्व विभागांच्या कामकाजात एकसूत्रता येईल. महापालिका प्रशासन आणि नागरिक या दोघांच्या दृष्टीने इआरपीची ही नवी प्रणाली लाभदायक असून नवी मुंबई महापालिकेने डिजीटायलेझेशनच्या दिशेने टाकलेले हे पुढचे पाऊल आहे.

या सोबतच लिडार सर्वेक्षणाचा आढावा घेताना आयुक्तांनी मालमत्ताकर विभागाने सर्वेक्षणाव्दारे उपलब्ध माहितीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही तत्परतेने सुरू करावी, असे निर्देशित केले.

# सानपाडा येथे रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कै. जयवंत अनंत आहेर यांच्या १२व्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण समितीच्या पदाधिकारी जयश्री आहेर यांच्या वतीने सानपाडा येथील गायत्री मंदिर येथे रविवारी (दि. १०)रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी घे भरारी महिला विकास सामजिक संस्थेची स्थापना करण्यात आली. आरोग्य तपासणी शिबिराला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष नामदेव भगत, भाऊ बापकर, स्थानिक माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर, मिलिंद सूर्यराव तसेच महिलांच्या मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या वेळी नामदेव भगत यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले. २५ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले.



# कांदळवनात डेब्रिजचे ढीग

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर ४ मधील कांडळवनात अतिक्रमण होऊ नये तसेच डेब्रिज आणि कचरा टाकला जाऊ नये यासाठी लोखंडी संरक्षण कुंपण बांधण्यात आले आहे, परंतु या परिसरातील लोखंडी कुंपणाची चोरी झाली असून खारफुटी क्षेत्रात डेब्रिज आणि कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. याकडे वनविभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

नेरूळ सेक्टर ४ येथील खाडी किनाऱ्यालगतचा परिसर खारफुटी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे. या परिसरात डेब्रिज आणि कचरा टाकला जात असल्याने लोखंडी जाळीचे कुंपण बसविण्यात आले आहे, परंतु या कुंपणाची मोडतोड झाली असून अनेक ठिकाणच्या जाळ्यांची चोरी झाली असून या परिसरात कचरा आणि डेब्रिज टाकले जात आहे.

याकडे महापालिका प्रशासनासह वनविभागाचेदेखील दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे आणि डेब्रिज माफियांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# गव्हाण विद्यालयात प्रोग्रामिंग कार्यशाळा सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अटल टिंकरींग प्रयोगशाळेत तीन दिवसीय प्रोग्रामिंग कार्यशाळेस सोमवारी (दि. ११) प्रारंभ झाला. ही कार्यशाळा ११ ते १३ डिसेंबर २०२३ अखेर सलग तीन दिवस होणार आहे.

विविध प्रकल्पांसाठीचे व ॲप्लिकेशन प्रोग्रॅमिंग कोड तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून प्रकल्प निर्मितीचे प्रशिक्षण देण्यासाठीची कार्यशाळा विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली. सिद्धेश राणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या ह्या कार्यशाळेत अटल टिंकरिंग विभागाचे विद्यार्थी बालवैज्ञानिक आणि अटल टिंकरिंग प्रमुख संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर तसेच विज्ञान शिक्षक शितल कुमार म्हात्रे आणि प्रशांत परदेशी दिवसभराच्या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी झाले.

प्रारंभी कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व लाईफ मेंबर आणि अटल टिंकरिंग प्रयोगशाळेचे प्रमुख रवींद्र भोईर यांनी प्रशिक्षक सिद्धेश राणे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी ज्येष्ठ शिक्षक आर. एस. पी. समुपदेशक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, शितलकुमार म्हात्रे, प्रशांत परदेशी तसेच सेवक जनार्दन खैरे आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# केबीपी कॉलेजमध्ये भारतीय भाषा दिवस

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये सोमवारी (दि. ११) भारतीय भाषा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आधुनिक तमीळ कवी सुब्रमनिया भारती यांच्या जयंतीचे निमित्त साधून ११ डिसेंबर हा दिवस भारतीय भाषा दिवस म्हणून साजरा करण्याचे शासनाने जाहीर केले. भारतीय भाषामधील विविधता व एकात्मता लक्षात घेऊन व विद्यार्थ्यांना इतर भाषेतील लोकसंस्कृती समजण्यासाठी केबीपी कॉलेजने एका व्याख्यानपर कार्यकमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. प्राची सिन्हा उपस्थित होत्या. डॉ. प्राची सिन्हा यांनी उत्तर भारतीयांची भाषा आणि संस्कृती या विषयावर मंत्रमुग्ध करणारे व्याख्यान दिले. डॉ. सिन्हा यांनी उत्तर भारतातील उत्तरांचल, बुंदेलखंड, मध्य प्रदेश या पट्ट्यातील लोकभाषा, त्यांची संस्कृती, आहार, पोशाख, सामाजिक, धार्मिक व वैवाहिक चालीरिती, परंपरा याविषयी तपशिलपूर्ण माहिती दिली.

कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आबासाहेब सरवदे यांनी केले. आभार प्रा. माया कळविकट्टे यांनी मानले. कार्यक्रमासाठी आर्ट सर्कल समितीतील सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.



# मोहोपाड्यात १५०० कापडी पिशव्यांचे वाटप




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

प्रसोल केमिकल लिमिटेड व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने प्लॅस्टिक बंदी जनजागृती रॅली व कापडी बॅग वाटप कार्यक्रम मोहोपाडा बाजारपेठ व आसपासच्या परिसरात वाटप करण्यात आला.

मोहोपाडा मार्केटमध्ये रविवारी (दि. १०) आठवडा बाजार असल्यामुळे नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. प्लॅस्टिक बॅग बंदी असूनसुद्धा बाजारपेठेत प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर मोठ्या प्रमाणत केला जात असल्याने त्याला पायबंद बसावा आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून नागरिकांना पर्यावरणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी म्हणून प्रसोल केमिकल खोपोली व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टमार्फत या वेळी १५०० कापडी पिशव्या वाटप करण्यात आल्या.

वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच संदीप मुंढे, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, प्रसोल केमिकल मॅनेजर योगेश पाटील, रोटरी क्लब माजी अध्यक्ष गणेश काळे, राजेश शिंदे, संतोष वाघमारे, सदस्य ग्रामपंचायत तुराडे निलेश जाधव, नियती एंटरप्राईजेस रमेश जाधव, किशोर पाटील, रवींद्र ढवाळकर, सचिन पाटील, जगदिश ढवाळकर, संजय ढवळकर विजय शिंदे, रोहिदास शिवले आदी उपस्थित होते.

# हेटवणे धरण सुधारित योजनेला मान्यता मिळावी

## आमदार रविशेठ पाटील यांची उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हेटवणे धरण मध्यम प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित योजनेला प्रशासकीय मान्यता मिळावी, अशी मागणी भाजप आमदार रविशेठ पाटील यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्रान्वये केली.



पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून प्रगतिपथावर आहे. या प्रकल्पाबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली असता मुख्य धरणाची बहुतांश कामे पूर्ण झालेली असून भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियादेखील पूर्ण झालेली आहेत. धरणाची घळभरणी सन २००० सालीच पूर्ण झालेली आहे. असे असतानादेखील कालव्याची कामे अद्यापपर्यंत न झाल्यामुळे गेल्या २०-२२ वर्षांपासून होत असलेल्या पाणीसाठ्याचा प्रत्यक्ष लाभ लाभधारक शेतकऱ्यांना मिळालेला नाही ही वस्तुस्थिति आहे. या अनुषंगाने आता प्रकल्पाची उर्वरित कामे तातडीने हाती घेऊन कालमयदित प्रकल्प पूर्ण करावेत, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे.

प्रकल्पाची सविस्तर माहिती घेतली असता कामांचे नियोजन करण्यासाठी प्रकल्पाला चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. सन २०२२-२३मध्ये प्रकल्पाची तांत्रिक छानणी पूर्ण झालेली आहे. महामंडळाने प्रस्ताव जानेवारी २०२३मध्ये शासनास सादर केलेला आहे. प्रकल्पास सर्व वैधानिक मान्यता प्राप्त आहेत तसेच शासन स्तरावरील तांत्रिक तपासणीदेखील अंतिम टप्प्यात आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पाच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी आपल्या स्तरावरून तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

हेटवणे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पेण तालुक्यातील ४५ गावांच्या चार हजार २६८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाच्या व पिण्याच्या पाण्याच्या शाश्वत सुविधा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे त्यामुळे प्रकल्पाची निकड लक्षात घेता प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव आगामी मंत्रिमंडळात बैठकीत ठेवण्याकरिता संबंधितास निर्देश द्यावेत, अशी मागणी आमदार रविशेठ पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका पंचायत समिती अंतर्गत तालुकास्तरीय ५१व्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नेरळमध्ये करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनात तब्बल ११९ प्रकल्प मांडण्यात आले होते.

नेरळ येथील हाजी लियाकत इंग्लिश मीडियम स्कूल येथे प्रदर्शन घेण्यात आले. उद्घाटन समारंभास पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौड, हाजी लियाकत संस्थेचे अध्यक्ष लियाकत सहेद, सचिव अब्दुल लियाकत सहेद, विज्ञान मंडळाचे अध्यक्ष अनिल गलगले, सचिव विवेक बोरसे, जिल्हा परिषद शिक्षण समितीचे माजी सदस्य सुरेश चव्हाण यांच्यासह पंचायत समितीमधील सर्व केंद्र प्रमुख उपस्थित होते.

याचबरोबर नेरळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राजेश मिरकुटे, रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन उपाध्यक्ष दीपक थोरात, नेरळ विद्यामंदिरचे मुख्याध्यापक पी.बी. विचवे, राजेंद्र सोनवणे, विस्तार अधिकारी अरुण पारधी, मोहन पाटील, समीर येरुणकर, प्रतिभा साळोखे, प्रदीप सुर्वे, देविदास जाधव, दिलीप घुले, अरुणा गंगावणे, बाळासाहेब पालवे, अशोक म्हसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कर्जत विज्ञान मंडळाचे अध्यक्ष अनिल गलगले यांनी, तर सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये प्राथमिक गटात ६९, माध्यमिक गटात ३३ आणि शिक्षक गटात १७ असे तब्बल ११९ प्रकल्प होते. या वर्षी खास बाब म्हणून प्रश्नमंजुषा आणि चित्रकला रंगभरण स्पर्धाही घेण्यात आली.

# लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना नागोठण्यात अभिवादन



## भाजप कार्यालयात जयंती साजरी

**नागोठणे : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, सर्वसामान्य जनतेचे तारणहार लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांची जयंती नागोठणे येथील भाजपच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी सर्वांनी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस फुल वाहून दर्शन घेत अभिवादन केले.

या कार्यक्रमास भाजप रोहा तालुका महामंत्री आनंद लाड, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका उपाध्यक्ष अपर्णा सुटे, भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी, माजी तालुका अध्यक्ष मनोज धात्रक, माजी सरचिटणीस शामकांत नेरपगार, माजी ग्रामपंचायत सदस्य विवेक रावकर, वांगणी ग्रामपंचायत माजी सरपंच विद्यमान सदस्य एकनाथ ठाकूर, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, तालुका उपाध्यक्ष विठोबा माळी, अल्पसंख्याक सेल माजी तालुका अध्यक्ष रऊफ कडवेकर, नागोठणे जि.प. गण अध्यक्ष शेखर गोळे, माजी विभागीय अध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, मोहन लाड, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष प्रियांका पिंपळे, शहर अध्यक्ष शितल नांगरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी स्व. गोपीनाथ मुंडेंना अभिवादन केले.

# आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात आरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

गॅलेक्सी हॉस्पिटल व इनरव्हील क्लब ऑफ पेण यांच्या विद्यमाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत पेण येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये आरोग्य व मार्गदर्शन शिबिर झाले. या शिबिरात वसतिगृहातील ७० मुलींची तपासणी करण्यात आली तसेच त्यांना आवश्यकतेनुसार औषधेही देण्यात आली.





शिबिराचे उद्घाटन सहाय्यक प्रकल्प अधिकारी सतीश शेरमकर यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रकल्प गृहपाल मानसी पाटील, गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉ. रत्नदीप गवळी, राजेश टेलर, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष ज्योती अवघडे, मुस्कान झटाम, प्रिया पाटील, संयोगिता टेमघरे, स्मिता पाटील, प्रीती गुडदे, ऋचा महालकर, सुकन्या पाटील, मानसी पाटील, मेघना चव्हाण, दीपिका शिगवण, प्रियांका मुखर्जी यांच्यासह वसतिगृहातील कर्मचारी उपस्थित होते.

डायलेसिससाठी डॉ. नैना जवाहरमलानी, डॉ. नयन ब्रम्हे, डॉ. विकास भिसे, डॉ. संकेत एखंडे, डॉ. विकास गुप्ता डॉ. सिद्धांत पाटील, डॉ. रिचा मिरगल, डॉ. सुनील कांबळे यांनी तपासणी केली.

### थंडीत चढ-उतार

**अलिबाग : प्रतिनिधी**

बदलत्या हवामानाचा थंडीवरही परिणाम जाणवत असून थंडीमध्ये चढ-उतार दिसून येत आहेत. त्यामुळे आजारांना निमंत्रण मिळत आहेत.

अलिकडच्या काही वर्षांत हवामानात प्रचंड प्रमाणात बदल दिसून येत आहेत. थंडीही कमी-जास्त प्रमाणात पडत असल्याचे जाणवते.

# दिव्यांगांना कृत्रिम अवयवासाठी तालुकानिहाय शिबिरे

## लाभ घेण्याचे खासदार सुनील तटकरे यांचे आवाहन



**असे आहे नियोजन**

**१६ डिसेंबर : श्रीवर्धन न. प. शाळा क्रमांक १**
**१७ डिसेंबर : कोटेश्वरी सभागृह, कोटेश्वरी तलावाजवळ महाड**
**१८ डिसेंबर : गांधी हॉल, निजामपूर रोड माणगांव,**
**१९ डिसेंबर : पंचायत समिती पोलादपूर**
**२० डिसेंबर : बल्लाळेश्वर देवस्थान भक्ती निवास क्र.१**
**२१ डिसेंबर : ज्येष्ठ नागरिक सभागृह रोहा**
**२२ डिसेंबर : दरबार हॉल, मुरूड**
**२३ डिसेंबर : कान्होजी आंग्रे समाधीजवळ न.प.शाळा क्रमांक १ अलिबाग**
**२४ डिसेंबर : आगरी समाज हॉल, पेण**

**रायगड : रामप्रहर वृत्त**

खासदार सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने रायगड जिल्हा लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग व्यक्तींना आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव वाटप करण्यासाठी तालुकानिहाय मोजमाप शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व दिव्यांग बांधवाना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये १६ ते २४ डिसेंबरदरम्यान या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत कृत्रिम अवयव मिळण्यासाठी तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी व मोजमाप घेण्यात येणार आहे. यामध्ये तीनचाकी सायकल, कॅलीपर, कुबड्या, कृत्रिम हात, कृत्रिम पाय, सीपीचेअर, व्हिलचेअर, ब्लाइंड डिजिटल स्टिक, गतिमंद मुलांसाठी शैक्षणिक किट, कानाचे डिजिटल श्रवणयंत्र, उच्च शिक्षण घेणाऱ्या १०० टक्के अंध दिव्यांग विद्यार्थ्यांना स्मार्ट मोबाईल फोन, दिव्यांगत्वाचे ८० टक्केपेक्षा अधिक प्रमाण असलेल्या अस्थिव्यंग व्यक्तींना बॅटरीवर चालणारी तीन चाकी सायकल देण्यात येणार आहेत.

या योजनेच्या लाभासाठी दिव्यांग व्यक्तीकडे वैद्यकीय मंडळाकडील णऊखऊ प्रणालीचा ४० टक्केवरील दाखला, दिव्यांग व्यक्तींचा कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला वार्षिक उत्पन्न दोन लाख ५० हजारांपेक्षा कमी, रहिवासी दाखला अथवा रेशनकार्ड झेरॉक्स प्रत, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधारकार्डची झेरॉक्स प्रत हे सर्व दाखले या शिबिरास्थळी दिव्यांग व्यक्तींना घेऊन येणे आवश्यक आहे. दिव्यांग बांधवांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करणारे वैयक्तिक पत्र खासदार तटकरे यांनी पाठविले आहे.

# कर्जतमध्ये विविध विकासकामांचे उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून विशेष रस्ता योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कर्जत नगर परिषद हद्दीतील विविध विकासकामांचे उद्घाटन झाले. यासाठी एकूण ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

कर्जत पालिका हद्दीतील दहिवली परिसरात नगरसेवक संकेत भासे यांच्या माध्यमातून विकासकामे करण्यात आली. त्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी शासनाच्या विशेष रस्ते योजनेमधून निधी मंजूर करून घेतला होता. त्या सर्व कामांचे उद्घाटन झाले. उद्घाटन समारंभास नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेवक केत भासे, बळवंत घुमरे, नगरसेविका पुषा दगडे, सुवर्णा निलधे, वैशाली मोरे, प्राची डेरवणकर, शिवसेनेचे शहरप्रमुख अभिषेक सुर्वे, संघटक नदीम खान, उप शहरप्रमुख दिनेश कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



# सुंदरराव मोरे महाविद्यालयात कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच कौशल्य विकास आणि करिअर मार्गदर्शन झाले.



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व करिअर कट्टा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सेमिनारच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांनी प्रमुख अतिथी व तज्ज्ञ मार्गदर्शकांचे स्वागत केले.

मुंबई घाटकोपर येथील विमल-वर्षा फाउंडेशनच्या प्रायोजकत्वाखाली सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. फाउंडेशनचे संस्थापक सुभाष किसन मालुसरे यांनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना करिअरच्या बाबतीत अजूनही पुरेसे ज्ञान नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करून त्यांना आयटी, इन्फ्रा या क्षेत्रात नोकरीची सुवर्णसंधी मिळवून देण्यासाठी सेमिनार आयोजित केल्याचे सांगितले. सुभाष मालुसरे यांनी फाउंडेशनमार्फत कशा प्रकारे सहकार्य मदत केले जाते याची माहिती उपस्थितांना दिली.

या सेमिनारमध्ये फाउंडेशनचे खजिनदार नितेश मालुसरे, हरीश शेडगे, दीपक धानवे, प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. राम बरकुले यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# कैलास घरत यांना महात्मा फुले फेलोशिप पुरस्कार

**पेण : प्रतिनिधी**

खारपाडा गावातील सामाजिक कार्यकर्ते कैलास घरत यांना भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली)चा महात्मा ज्योतिबा फुले राष्ट्रीय फेलोशिप पुरस्कार प्राप्त झाला आहे.

राष्ट्रीय कवी साहित्य संमेलन दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एस.पी.सुमनाक्षर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या संमेलनास माजी मंत्री, राष्ट्रीय महासचिव यश सुमनाक्षर, सुनील बागुल, पत्रकार विजय कांबळे, शशिकांत सावंत, नितीन चंदनशिवे, कवी, साहित्यिक विलास देवळेकर उपस्थित होते. फेलोशिप पुरस्काराबद्दल कैलास घरत यांचे अभिनंदन होत आहे.



# तटकरे महाविद्यालयात सायबर सुरक्षाविषयक मार्गदर्शन



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दल आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल)च्या संकल्पनेतून सुरक्षित व सतर्क समाज घडवण्यासाठी जनजागृतीपर अभियानचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने एमकेसीएल व रायगड जिल्हा पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने येथील द.ग. तटकरे महाविद्यालय येथे सोमवारी (दि. १० डिसेंबर) सायबर सुरक्षाविषयक जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माणगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश आस्वर यांनी ऑनलाईन व अन्य फसवणूक होण्याचे प्रसंग आल्यास न घाबरता त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करून त्यांची माहिती गुप्त ठेवून संबंधित गुन्ह्यांचा तपास सायबर तज्ज्ञांमार्फत कशा प्रकारे केला जातो याबद्दल माहिती दिली. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ रायगड प्रतिनिधी मंगेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे सायबर सुरक्षेची आवश्यकता आणि विविध उपायांबद्दल सविस्तर माहिती दिली.

या उपक्रमास रायगड जिल्हा कन्सल्टंट विश्वास मते, प्राचार्य. बी. एम. खामकर, जे. आर. पांडे, सफा थांगे, देवांक परब, आदिल बडे, केंद्र समन्वयक सुरज महाडिक, किशोरी हिरवे आदी उपस्थित होते.

# ऋषभ पंत आयपीएलमध्ये खेळणार?

## इम्पॅक्ट प्लेअर म्हणून वापर करण्याचा दिल्लीचा विचार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ आणि दिल्ली कॅपिटल्सचा स्टार यष्टीरक्षक ऋषभ पंत गेल्या अनेक महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर आहे. दरम्यान, आयपीएल लिलावापूर्वी त्याच्याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. रेव्ह स्पोर्टच्या रिपोर्टनुसार दिल्ली कॅपिटल्स आगामी आयपीएलमध्ये ऋषभ पंतचे स्वागत करण्याच्या तयारीत आहे. त्याचे पुनरागमन कसे करायचे? यावर फ्रँचायझीने एक तोडगा काढला आहे. दिल्ली त्याचा एक प्रभावशाली खेळाडू म्हणजेच इम्पॅक्ट प्लेअर म्हणून वापर करण्याचा विचार करीत आहे.



दिल्ली कॅपिटल्सच्या सूत्रांनी रेव्हस्पोर्टला सांगितले की, आम्हाला ऋषभ पंतच्या पुनरागमनाची अपेक्षा असून ड्रेसिंग रूममध्ये पुन्हा त्याच्यासारखा कर्णधार असणे हे संघाच्या हिताचे आहे. सूत्रांनी पुष्टी केली की, फ्रँचायझी ऋषभ पंतबाबत घाई करू इच्छित नाही. दिल्ली कॅपिटल्स पंतच्या रिकव्हरीसाठी पूर्ण प्रयत्न करू इच्छित आहे आणि बहुतेक सामन्यांमध्ये त्याचा प्रभावशाली खेळाडू म्हणून वापर करण्याचा विचार करीत आहे.

ऋषभ पंत सध्या यष्टीरक्षक म्हणून खेळण्यास तयार नाही. तो यष्टिरक्षण करण्यास सक्षम आहे की नाही हे त्याच्या तंदुरुस्तीवर अवलंबून असेल. या बातमीतून समोर येणारी मोठी अपडेट म्हणजे दिल्ली कॅपिटल्स पंतला प्रभावशाली खेळाडू म्हणून वापरण्याचा आग्रह धरणार आहे. यात ते कितपत यशस्वी ठरतात हे पाहणेदेखील उत्सुकतेचे ठरणार आहे.

यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतला २०२२मध्ये कार अपघात झाला, ज्यामुळे त्याला क्रिकेटच्या मैदानापासून दूर राहावे लागले. अपघातानंतर मुंबईत त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि गेल्या काही महिन्यांपासून तो पुनरागमन करण्यासाठी खूप मेहनत घेत आहे. आता तो केव्हा पुनरागमन करू शकेल आणि पुनरागमन केल्यास तो पूर्ण तंदुरुस्त असेल की नाही हे येणाऱ्या काळातच समजणार आहे.

ज्युनियर वर्ल्डकप हॉकी स्पर्धा

## नेदरलँड्सवर मात करून भारतीय संघ उपांत्य फेरीत

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारताच्या युवा हॉकी संघाने ज्युनियर वर्ल्डकप स्पर्धेत अविस्मरणीय विजयाची नोंद केली. उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत भारतासमोर तगड्या नेदरलँड्सचे आव्हान होते. त्यांना भारताने ४-३ अशी मात दिली.

दुसऱ्या हाफमध्ये भारतीयांकडून आक्रमक खेळ झाला. आदित्य अर्जुन ललागे ३४व्या मिनिटाला भारताचे खाते उघडले. त्यानंतर पुढच्याच मिनिटाला अराईजित सिंग हुडालने गोल करून भारताला २-२ अशी बरोबरी मिळवून दिली. ५२व्या मिनिटाला सौरभ खुश्वालाने बरोबरी मिळवून दिली. सामना आता पेनल्टी शूटआऊटमध्ये जातो असे वाटत असताना उत्तम सिंगने ५७व्या मिनिटाला गोल करून भारताचा ४-३ असा विजय पक्का केला. भारताचा बचावपटू रोहितने अखेरच्या क्वार्टरमध्ये सहा पेनल्टी कॉर्नर वाचवून भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.

# सीकेटी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे तायक्वांदो स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महापालिकेच्या वतीने कामोठे येथे आयोजित जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक (ज्युनिअर कॉलेज) विद्यालयाने यश प्राप्त केले आहे.

अनामिका शर्मा हिने प्रथम, तर प्रेम पाटील याने द्वितीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर,





महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# आपट्यात मोहल्ला प्रीमियर लीग रंगली

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

आपटा गावामध्ये मोहल्ला प्रीमियर लीग नाईट अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते झाले.

या वेळी आपटा ग्रामपंचायतीचे सदस्य असद पिट्टू, माजी सदस्य शहजाद पिट्टू, सिराज मुल्ला, धर्मेंद्र भोईर, महेंद्र भोईर, कुरेश सिद्धीकी, शादाब मुल्ला, शफिक पटेल, अंजुम काजी, शाहबाज पावले, मोसीन मुल्ला, मन्नान मुल्ला, पप्पू काझी, मानताजिर मुल्ला, आरसालन दळवी, नवीद जळगावकर, राजू सिद्धीकी, मुफीद मुल्ला, मूजो सय्यद, तस्कीर मुल्ला, अश्फाक मुल्ला यांच्यासह कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडकडून नव्या खेळाडूंना संधी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत दौऱ्यासाठी इंग्लंडने कसोटी संघ जाहीर केला आहे. १६ सदस्यीय संघाचे नेतृत्व बेन स्टोक्सच्या हाती देण्यात आले आहे. अष्टपैलू ख्रिस वोक्सला स्थान मिळाले नाही. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाच्या निवडकर्त्यांनी तीन अनकॅप्ड खेळाडूंना संधी दिली आहे. वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सनशिवाय टॉम हार्टली आणि शोएब बशीर या दोन फिरकी गोलंदाजांची निवड करण्यात आली.

भारत दौऱ्यासाठी इंग्लंडने फिरकी विभागावर अधिक काम केले आहे. चार फिरकीपटूंच्या उपस्थितीमुळे इंग्लंडच्या फिरकी विभागात बरीच विविधता आहे. डावखुरा फिरकीपटू जॅक लीचचा राखीव म्हणून





हार्टलीची निवड करण्यात आली आहे. रेहान अहमदचे संघात पुनरागमन झाले आहे. तो उजव्या हाताचा लेग स्पिनर आहे, तर शोएब बशीर हा उजव्या हाताचा ऑफस्पिन गोलंदाज आहे.

हार्टले इंग्लंडकडून दोन एकदिवसीय सामने खेळला आहे. लँकेशायरसाठी त्याने २० प्रथम श्रेणी सामन्यात ४० विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, २० वर्षीय बशीरने २०२३मध्ये सॉमरसेटसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने सहा सामन्यांत १० विकेट्स घेतल्या आहेत. हार्टले आणि बशीर हे दोघेही गेल्या महिन्यात संयुक्त अरब अमिरातीमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या इंग्लंड लायन्स संघाचा भाग होते. दोन्ही खेळाडूंना प्रथमच कसोटी सामना खेळण्याची संधी मिळू शकते.

अनुभवी जेम्स अँडरसन, मार्क वुड, ऑली रॉबिन्सन आणि ॲटकिन्सन यांच्या रूपाने इंग्लंडकडे वेगवान गोलंदाजीचे फक्त चार पर्याय आहेत. ॲशेस मालिकेमध्ये खेळलेल्या ख्रिस वोक्सला वगळण्यात आले आहे. कर्णधार बेन स्टोक्स गोलंदाजी करू शकणार की फक्त फलंदाज म्हणून खेळणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गेल्या महिन्यात त्याच्या डाव्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली. इंग्लंडकडे जॉनी बेअरस्टो आणि बेन फोक्स हे दोन विकेटकीपिंगचे पर्याय आहेत.

### असे होतील सामने

भारत दौऱ्यावर इंग्लंड संघ पाच कसोटी सामने खेळणार आहे. पहिला कसोटी सामना २५ जानेवारीपासून हैदराबादमध्ये खेळवला जाणार आहे. यानंतर दुसरी कसोटी २ फेब्रुवारीपासून विशाखापट्टणम येथे होईल. तिसरा कसोटी सामना १५ फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये, चौथा २३ फेब्रुवारीपासून रांची येथे आणि पाचवा व शेवटचा सामना ७ मार्चपासून धरमशाला येथे खेळवला जाणार आहे.

### असा आहे इंग्लिश संघ

बेन स्टोक्स (कर्णधार), रेहान अहमद, जेम्स अँडरसन, गस ॲटकिन्सन, जॉनी बेअरस्टो, शोएब बशीर, हॅरी ब्रूक, जॅक क्रॉली, बेन डकेट, बेन फोक्स, टॉम हार्टले, जॅक लीच, ऑली पोप, ऑली रॉबिन्सन, जो. रूट आणि मार्क वुड.

# ...अन् दगडफेक करणारी मुलगी बनली फुटबॉलपटू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने २०१९ साली जम्मू काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते, परंतु सर्वोच्च न्यायालयानेही हा निर्णय योग्य असल्याचे सांगत कलम ३७० रद्द ठेवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी कलम ३७० रद्द केल्याने गेल्या चार वर्षांत जम्मू काश्मीरमध्ये काय सकारात्मक चर्चा झाली याबाबत माहिती दिली आहे तसेच एका तरुण खेळाडूचाही यात उल्लेख करण्यात आला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या लेखात अफशा आशिक हिचा उल्लेख केला आहे. ती कधीकाळी श्रीनगरमधील दगडफेकीत सहभागी होती. कलम ३७० रद्द झाल्यानंतर तिला तिच्यातील फुटबॉलचे कौशल्य दिसले. तिला त्यानुसार प्रशिक्षण मिळाले आणि आज ती देशातील नामवंत फुटबॉलपटू आहे. याबाबत पंतप्रधान मोदी लिहितात, क्रीडा क्षेत्रातील तरुणांची क्षमता लक्षात घेऊन आम्ही जम्मू आणि काश्मीरमध्ये विविध उपक्रम राबवले. विविध खेळांच्या माध्यमातून तेथील तरुणांच्या आकांक्षा आणि भविष्यात झालेले बदल आम्ही पाहिले आहेत. या दरम्यान विविध खेळांच्या जागांचे आधुनिकीकरण करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. प्रशिक्षक उपलब्ध करून दिले. स्थानिक पातळीवर फुटबॉल क्लबची स्थापना करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या सर्वांचा परिणाम चांगला होता.

# अंडर-१९ विश्वचषकात भारताची बांगलादेशविरुद्ध सलामीची लढत

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

पुरुषांच्या अंडर-१९ विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर झाले असून ही स्पर्धा १९ जानेवारीपासून सुरू होत आहे. भारतीय संघ २० जानेवारीपासून बांगलादेशविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. सुपर-६मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात महामुकाबला पाहायला मिळू शकतो.

ICC
U19 MEN'S CRICKET
WORLD CUP
SOUTH AFRICA 2024

या वेळी विश्वचषकात चार गट करण्यात आले आहेत. चारही गटात प्रत्येकी चार संघ ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील उर्वरित तीन संघांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळेल. चारही गटांतील अव्वल तीन संघ पुढील फेरीत प्रवेश करतील. म्हणजेच दुसऱ्या फेरीत एकूण १२ संघ असतील. येथे प्रत्येक संघ दुसऱ्या गटातील दोन संघांसह प्रत्येकी एक सामना खेळेल. म्हणजेच या फेरीत प्रत्येक संघाचे दोन सामने होतील. यानंतर सर्वोतम चार संघ उपांत्य फेरीत पोहचतील. सेमीफायनल आणि फायनलसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आला आहे.

स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत होणार आहे. सर्व सामने येथील पाच मैदानांवर खेळवले जातील. ग्रुप स्टेजमध्ये भारतीय संघ दुसरा सामना २५ जानेवारीला आयर्लंडशी आणि तिसरा सामना २८ जानेवारीला अमेरिकेविरुद्ध खेळणार आहे. ही

१९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेमध्ये एकूण १६ संघ सहभागी होणार असून हा विश्वचषक तीन टप्प्यात खेळवला जाणार आहे. अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, भारत, आयर्लंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे या देशांना विश्वचषकासाठी थेट प्रवेश मिळाला आहे. उर्वरित पाच संघ क्षेत्रीय पात्रता फेरीद्वारे निश्चित करण्यात आले. नामिबिया, न्यूझीलंड, नेपाळ, स्कॉटलंड आणि यूएसए यांना प्रादेशिक पात्रता फेरीतून प्रवेश मिळाला.

### टीम इंडियाचा दबदबा

१९८८पासून अंडर-१९ वर्ल्डकपचे आयोजन केले जात आहे. हे १९९८पासून दर दुसऱ्या वर्षी आयोजित केले जाते. भारतीय संघ हा अंडर-१९ विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी संघ आहे. टीम इंडियाने २०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२मध्ये अंडर-१९ वर्ल्ड कपवर नाव कोरले आहे. याशिवाय २०१६ आणि २०२०मध्ये भारत उपविजेता ठरला.







# इनडोअर क्रिकेट एशिया कपची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाच्या मान्यतेने इंडियन इनडोअर स्पोर्ट्स फाउंडेशनने श्रीलंकेतील कोलंबो थलावाथुगोडा येथील ऑस्टेशिया स्पोर्ट्स क्लब या ठिकाणी इनडोअर क्रिकेट एशिया कप स्पर्धा होणार असल्याची घोषणा केली आहे. ही स्पर्धा १५ ते २० एप्रिल २०२४ या कालावधीत खेळली जाणार असल्याचे इंडियन इनडोअर स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष अजय नाईक व सचिव मिलिंद पुंजा यांनी जाहीर केले.

या स्पर्धेत यजमान श्रीलंकेसह, भारत, युएई व सिंगापूर असे चार देश सहभागी होत आहेत. या स्पर्धेत पुरुष गट व पुरुष मास्टर्स (४०+) व महिला गट असे संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेसाठी भारतात विविध राज्यांत वरील गटाच्या स्पर्धा होणार असून त्यातून त्या-त्या राज्यांच्या निवड चाचणी स्पर्धा होणार आहेत. त्यातून निवड झालेले खेळाडू राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेत खेळतील. या निवड चाचणीतून भारताचे संघ निवडले जाणार आहेत.

स्पर्धेसाठी बंगळुरू येथे ९ व १० फेब्रुवारी रोजी चाचणी घेऊन भारतीय संघाच्या २४-२४ खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. भारतीय संघात निवड झालेल्या खेळाडूंचे शिबिर मुंबई व बंगळुरू येथे आयोजित केले जाणार आहे, अशी माहिती देण्यात आली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com